रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ११२ । पृष्ठे ८+४ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹


आजचा रंग मोरपंखी



## रशियाचा युक्रेनवर मोठा हवाई हल्ला

**रशिया :** रशियाने युक्रेनवर रविवारी ड्रोन आणि क्षेपणास्त्राने मोठा हल्ला केला. अनेक जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यात राजधानी कीवला लक्ष्य केलं गेलं. गेल्या महिन्यात कीववर झालेल्या हवाई हल्ल्यात २१ जणांचा मृत्यू झाल्यानंतरचा हा पहिलाच मोठा हल्ला आहे.कीव शहर प्रशासनाचे प्रमुख तैमूर तकाचेंको यांनी रविवारी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील निवासी भागांना लक्ष्य करून झालेल्या हल्ल्यात १० जण जखमी झाले. मृतांमध्ये १२ वर्षांच्या मुलीचाही समावेश आहे. शहराच्या मध्यभागी झालेल्या स्फोटातून काळा धूर निघताना दिसत होता. युक्रेनच्या हवाई दलाने सांगितलं की, रशियाने एकूण ५९५ स्फोटक ड्रोन आणि सिम्युलेटेड शस्त्र आणि ४८ क्षेपणास्त्रे डागली.

## वे|ध|क

### तिरुपतीला महाराष्ट्र सरकारचे भूदान

**नवी मुंबई :** तिरुमला तिरुपती देवस्थानम मंडळाला नवी मुंबई विमानतळाजवळील कोट्यवधीचा भूखंड ४० हजार ६०० रुपयांत दिल्यानंतर आता त्यालगतच दुसरा भूखंडही या मंडळाला कवडीमोल दरात दान करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. वरून आलेल्या आदेशानुसार सिडकोच्या संचालक मंडळाने ठराव मंजूर केल्याने हा भूखंड देवस्थानाला बहाल करण्याची केवळ औपचारिकता उरली आहे.

### हॉटेल कामगाराचा मृतदेह सापडला

**आगरदांडा :** मुरुड शहरातील प्रसिद्ध हनुमान हॉटेलमधील कामगार शीतला रामपाल प्रसाद कोणालाही न सांगता निघून गेला होता. परंतु मुरुड कब्रस्थानजवळ त्याचा मृतदेह आढळून आला. एकदरा खाडीच्या पाण्यात मृतदेह फुगलेला दिसून आला. या बाबतची खबर नरेंद्र धीरेंद्र सिंग यांनी मुरुड पोलिसांना दिली. याबाबत मुरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### लोकलवर दगडफेक

**मुंबई :** उपनगरीय लोकलवर दगडफेकीच्या घटना सुरूच आहेत. रे रोड रेल्वे स्थानकात झालेल्या दगडफेकीत २८ वर्षीय प्रवासी तरुणी जखमी झाली. आठवड्याभरतील ही तिसरी घटना आहे. या तरुणीवर केईएम रुग्णालयात उपचार करण्यात आले. मुंबई उपनगरीय लोकलमधून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. मात्र अधूनमधून काही भागांतून लोकलवर दगडफेकीच्या घटना घडतात.

# सात जिल्ह्यांना रेडअलर्ट, राज्याला हायअलर्ट



**। रायगड । प्रतिनिधी । महाराष्ट्राला पावसानं झोडपून काढलं आहे. राज्यात पावसामुळे हाहाकार उडाला आहे. चिंतेची बाब म्हणजे पुढील २४ तासांमध्ये राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. आयएमडीकडून राज्यातील सात जिल्ह्यांना रेड अलर्ट तर उर्वरीत सर्व जिल्ह्यांना हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानं पुढील ४८ तास राज्यात पावसाचा जोर कायम राहणार आहे, सोमवारी हवामान विभागाकडून मुंबई, ठाणे, जालना, रायगड, पालघर, नाशिक आणि पुणे या जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर उर्वरीत सर्व जिल्ह्यांमध्ये देखील मुसळधार पावसाचा इशारा आहे.**

## घराबाहेर न पडण्याचं आवाहन

**पुढील काही तासांमध्ये राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. आधीच काही जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट देण्यात आलेला आहे. जर पाऊस असाच राहिला तर पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे अति महत्त्वाचं काम असेल तरच घराबाहेर पडा. अन्यथा घरातच थांबा, असे आवाहनही शासनच्या वतीने करण्यात आले आहे. राज्यात पावसामुळे मोठे नुकसान झाले असून, हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली गेली आहे. याचा शेतकऱ्यांना प्रचंड फटका बसला आहे. शासनाकडून युद्धपातळीवर मदत सुरू करण्यात आली आहे.**

> **मराठवाड्यातील रस्ते, पूल, शाळा, आरोग्य केंद्र यांचेही मोठे नुकसान आहे. सर्व यंत्रणा सतर्क आहेत. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाचे जवान आणि गरज भासली तर लष्कर मदतीला घेतले जाईल.**
>
> **– जितेंद्र पापळकर, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

### मराठवाड्यात पावसाचे थैमान

गेल्या दोन दिवसांपासून परतीच्या पावसाने संपूर्ण महाराष्ट्राला झोडपून काढले आहे. पावसामुळे रस्ते, पूल, शाळा, आरोग्य केंद्र, शेतीचे, घरांचे, वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेकांना या पुरपरिस्थिमध्ये जीवही गमवावा लागला आहे. मराठवाड्यात सहा जिल्ह्यांत पुन्हा एकदा पावसाने थैमान घातले. शुक्रवारी रात्रीपासून सुरू झालेल्या पावसाने कर्नाटक, तेलंगणाकडे जाणारे मार्ग तसेच ग्रामीण भागातील •➤पान २ वर

### मराठवाड्यातील भीषण स्थिती

| | |
|---|---|
| बाधित गावांची संख्या | 2857 |
| मृत्यू झालेल्या व्यक्ती | 90 |
| जनावरांचे मृत्यू | 2534 |
| बाधित शेतकऱ्यांची संख्या | 36,17,172 |
| एकूण बाधित क्षेत्र | 22,47,980 हेक्टर |
| पूर्ण झालेले पंचनामे | 72.74 टक्के |

**आपत्कालीन परिस्थितीत खालील क्रमांकांवर संपर्क साधण्याचं आवाहन शासनाकडून करण्यात आले आहे.**

बीड ०२४४२-२९९२९९ ०२. लातूर ०२३८२-२२०२०४ ०३. धाराशिव ०२४७२-२२७३०१ ०४. नांदेड ०२४६२-२३५०७७ ०५. परभणी ०२४५२-२२६४०० ०६. सोलापूर ०२१७-२७३१०१२ ०७. पुणे ०९३७०९६००६१ ०८. सातारा ०२१६२-२३२३४९ ०९. अहिल्यानगर ०२४१-२३२३८४४ १०. गडचिरोली ०७१३२-२२२०३१ ११. कोल्हापूर ०२३१२-६५९२३२ १२. रायगड ०८२७५१५२३६३ १३. रत्नागिरी ०७०५७२२२३३ १४. सिंधुदुर्ग ०२३६२-२२८८४७ १५. पालघर ०२५२५-२९७४७४ १६. ठाणे ०९३७२३३८८२७ १७. मुंबई शहर व उपनगर १९१६/०२२-६९४०३३४४ यासोबतच मंत्रालयातील २४/७ कार्यकेंद्र क्रमांक ०१. ०२२-२२०२७९९० ०२. ०२२-२२७९४२२९ ०३. ०२२-२२०२३०३९ ०४. ०९३२१५८७१४३

# शेतकरी हवालदिल

**भाताची पिके जमिनीवर कोसळली**



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात भाताच्या पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना यावर्षी पावसाने सतत झोडपले आहे. मे महिन्यातील पहिल्याच आठवड्यात सुरू झालेला पाऊस थांबण्याचे नाव घेत नाही. आता तर शेतात उभी असलेली पिके वादळी वाऱ्यासह सुरू असलेल्या पावसामुळे जमिनीवर कोसळली आहेत. शासनाच्या अधिकाऱ्यांना याचे काही सोयरसुतक नसल्याचे दिसून येत असून पंचनामे करूनदेखील मदत मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

मे महिन्यातील •➤पान २ वर

## पावसाचा कहर सुरुच

**महाड, तळामधील नऊ ठिकाणी घरांची पडझड**



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात शनिवारपासून पावसाने पुन्हा सुरुवात केली. रविवारी दिवसभर पाऊस सुरूच राहिला. पावसाने कहरच केला. सतत सुरू असलेल्या पावसात मोठी हानी झाली नसली तरी अनेक सखल भागात पाणी साचले. तळा, महाड तालुक्यात नऊ ठिकाणी घरांची पडझड झाली.

> **जिल्ह्यात पाऊस सुरु आहे. या पावसात कोणतीही जीवितहानी झाली नाही. काही घरांच्या भिंती कोसळल्या आहेत. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासन तत्पर आहे. सोमवारी ऑरेंज अलर्टचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी .**
>
> **– सागर पाठक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**

## नवरात्रौत्सवावर पावसाचे विरजण

नवरात्रौत्सव गेल्या आठ दिवसांपासून सुरू झाला आहे. गरबा नृत्यांसह भजन, जाखडी नृत्य आदी सांस्कृतिक कार्यक्रमांसह धार्मिक, सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. पाऊस पडत असल्याने या कार्यक्रमांवर अडथळे येऊ लागले आहेत. त्यामुळे नवरात्रौत्सवावर पावसाचे विरजण पडल्याचे चित्र आहे.

सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. सोमवारी ऑरेंज अलर्टचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. विजांच्या कडकडाटासह •➤पान २ वर

# उरणमध्ये घरांची पडझड

**रायगड आपत्कालीन व्यवस्थापन कोमात**

**। उरण । वार्ताहर ।**

दोन दिवसांची उसंत घेतल्यानंतर शनिवारी (दि.२७) रात्रीपासून पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली. वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसामुळे उरणमधील बहुतांश भातशेती आडवी पडली असून रहिवाशांच्या घरांची पडझड झाली आहे. तालुक्यातील अनेक भागातील जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांना, रहिवाशांना मदतीचा हात देणारी उरण तालुक्यातील व रायगड जिल्ह्यातील आपत्कालीन व्यवस्थापन मात्र कोमात गेल्याचे चित्र रविवारी दिसून येत असल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

परतीच्या पावसाने सध्या कोकणातील अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. शासकीय आपत्कालीन व्यवस्थापन सतर्क झाले आहे. मात्र उरण तालुक्यात शनिवारी रात्रीपासून



पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली. शासकीय •➤पान २ वर

## वीज कोसळून पाच जखमी

**। मनोर । प्रतिनिधी ।**

पालघर तालुक्याच्या पूर्वेकडील मासवण-नागझरी रस्त्यावरील खरशेत गावातील गोवारीपाड्यात शनिवारी (दि.२७) रात्री आकाशातील वीज घरावर कोसळून पाच जण जखमी झाले होते. जखमींवर मनोर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर घरी सोडून देण्यात आले. टीव्हीच्या डिश ॲन्टेनाच्या केबलमधून विजेचा लोळ घरात शिरल्याने भिंतीला भेग पडली आहे. विजेमुळे टीव्ही आणि विद्युत उपकरणे जळून मोठे नुकसान झाले आहे.

शनिवारी रात्री ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. रात्री दहा वाजण्याच्या सुमारास खरशेत गोवारीपाड्यातील विलास धानवा यांच्या घरावर वीज पडली. स्वयंपाकघरामध्ये काम करणाऱ्या दोघी, तसेच हॉलमधील तिघांना विजेचा धक्का बसला. या घटनेत वैशाली विलास धानवा (वय ४९), ऋतिक (१९), सोनम प्रकाश धानवा (२४), भारती साबला (३०) आणि तेजल (१२) या जखमी झाल्या. त्यांच्यावर मनोरच्या रुग्णालयात उपचार केल्यानंतर रविवारी (दि. २८) सकाळी जखमींना घरी सोडण्यात आले. •➤पान २ वर

# सुधाकर घारे यांची सर्वोच्च न्यायालयात धाव

**मुंबई उच्च न्यायालयात याचिका फेटाळले**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदारसंघात पराभूत झालेले अपक्ष उमेदवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांनी सर्वोच्च न्यायालयात मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान दिले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काही हजार मतांनी पराभूत झाल्यांनंतर सुधाकर घारे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केले होते. ते याचिका फेटाळून लावून महेंद्र थोरवे यांची आमदारकी कायम ठेवण्याचा निर्णय दिला होता.

२०२४ मध्ये झालेल्या कर्जत विधानसभा मतदारसंघात शिवसेना भाजप राष्ट्रवादी यांच्या महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी विजय मिळविला होता. त्यानंतर काही महिन्यांनी पराभूत झालेले अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांनी मुंबई उच्च न्यायालयात आमदार महेंद्र थोरवे यांच्या विजयाला आव्हान दिले होते. त्या याचिकेत आमदार म्हणून निवडून आलेले महेंद्र थोरवे यांनी मतदारांना भडकावणे, धमकावणे तसेच आपल्या नावाशी साम्य असलेले सुधाकर घारे या नावाचे डमी उमेदवार उभे करून आपला विजय हिरावून घेतला असा आरोप सुधाकर घारे यांच्या याचिकेत करण्यात आला होता.

गेली सहा महिने या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. अखेर आज या याचिकेचा निकाल दिला असून विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांच्या विरोधात दाखल केलेली याचिका फेटाळून लावली होती. सुधाकर घारे अधिक आक्रमक झाले असून त्यांच्याकडून सर्वोच्च न्यायालयात २४ सप्टेंबर रोजीच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान दिले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने सुधाकर घारे यांच्या याचिकेवर २४ सप्टेंबर रोजी निर्णय दिल्यानंतर अवघ्या तिसऱ्याच दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांनी आव्हान दिले आहे. सुधाकर घारे यांच्याकडून आता आमदार महेंद्र थोरवे यांच्या विजयला थेट सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून अपक्ष उमेदवार •➤पान २ वर

## ग्रामीण कथाकार प्रा. भास्कर चंदनशिव यांचे निधन

**। छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

ग्रामजीवनाचा थोर बखरकार, ग्रामीण समाजमनाची स्पंदने संवेदनशीलपणे टिपणारा लेखक, सर्जनाचा मूल्यगर्भ आविष्कार म्हणून ज्यांच्या लेखन शैलीला गौरवण्यात ते ज्येष्ठ साहित्यिक प्रा. भास्कर तात्याबा चंदनशिव यादव यांचे रविवारी लातूर येथे उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कळंब येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

प्रा. चंदनशिव यांना १६ सप्टेंबर रोजीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा जीवनसाधना पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. प्रकृतीच्या कारणास्तव ते येऊ शकतात की नाही, असे सांगितले जात होते. चंदनशिव यांनी पुरस्कार स्वीकारला. यापूर्वी उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी जांभुळढव्ह, रानसय या कथासंग्रहासह राज्य शासनाचे तीन पुरस्कार मिळाले होते. आचार्य अत्रे, आदर्श शिक्षक, दलितमित्र आदी •➤पान २ वर

**मशाल महोत्सव केला साजरा | दर्शन घेण्यासाठी भाविकांनी केली मोठी गर्दी**

# शेकडो मशालींनी उजळला किल्ले प्रतापगड




### दोन घटांची परंपरा

किल्ले प्रतापगडावर भवानी माता मंदिरात नवरात्रीत दोन घट बसविले जातात. हिंदवी स्वराज्याची स्थापना केली म्हणून एक घट छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने बसवला जातो. तर या हिंदवी स्वराज्याचा पाया मजबूत केला म्हणून दुसरा घट हा राजाराम महाराज यांच्या नावाने बसविला जातो. ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरु आहे. किल्ले प्रतापगडावरील भवानी माता ही साताऱ्याच्या राजघरण्याचे कुलदैवत आहे. या वेळी नवरात्रोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम केले जातात.

**। सातारा । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवरायांच्या देदिप्यमान पराक्रमाची साक्ष देणारा किल्ले प्रतापगडवर परंपरेप्रमाणे यंदाही अश्विन शुद्ध षष्ठीला मशाल महोत्सव साजरा झाला. शनिवारी (दि.२७) रात्री तब्बल ३६६ मशालींनी हा गड उजळून निघाला. हा मशाल महोत्सव पाहण्यासाठी व श्री भवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

शिवाजी महाराजांनी अश्विन शुद्ध पंचमीला किल्ले प्रतापगडावर भवानी मातेची स्थापना केली. त्या प्रित्यर्थ किल्ले प्रतापगडवासिनी श्री भवानी मातेच्या मंदिरास ३६६ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हजारो शिवभक्तांनी प्रतापगडावर मशाल महोत्सव साजरा करतात. नवरात्र उत्सवात शुद्ध पंचमीला हा उत्सव साजरा केला जातो. •➤पान २ वर




# सार्वजनिक मंडळाला घर केले दान

## भगवान खताळ यांचे वारस झोरे कुटुंबियांनी जोपासली सामाजिक बांधिलकी



**। पाली । प्रतिनिधी ।**

**या आधुनिक जगामध्ये प्रत्येक गोष्टीला किंमत आहे. एखादी वीट सुद्धा कोणी कोणाला फुकट देत नाही. मात्र सुधागड तालुक्यातील खेमवाडी येथील खताळ कुटुंबीयांच्या वारसांनी आपल्या पूर्वजांचे राहते घर येथील खेमजाई नवतरून मित्र मंडळ खेमवाडी या मंडळाला दान करत अनोख्या दातृत्वाचे दर्शन घडविले आहे. गावाकऱ्यांना आता विविध धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यासाठी हक्काची जागा मिळाली आहे.**

सुधागड तालुक्यातील खेमवाडी-ताडगाव या गावाला गेली अनेक वर्ष त्यांचे स्वतःचे असे समाजमंदिर नव्हते. आणि जे होते ते गावाच्या मानाने खूप लहान होते. त्यामुळे गावात काही कार्यक्रम किवा लोकांना एकत्र येण्यासाठी कोणतीच हक्काची जागा नव्हती. गावाच्या आजूबाजूला सर्व बाहेरील लोकांनी जागा विकत घेवून कुंपण टाकून फार्महाउस तयार केले आहेत. त्यात हक्काची मोठी जागा उपलब्ध नसल्याने गावच्या तरुण मुलांना नवरात्र उस्तव, गावची पूजा तसेच सार्वजनिक कार्यक्रम व बैठक घेण्यासाठी प्रचंड कसरत करावी लागत असे. त्यामुळे खेमजाई नवतरून मित्र मंडळ खेमवाडी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मनावर घेऊन गावचे जेष्ठ व सगळ्यांचे आवडते व्यक्तीमत्व असणारे भगवान धोंडू खताळ व त्यांच्या पत्नी साखरी भगवान खाताळ यांच्या निधनानंतर गावच्या मध्यभागी असणारे त्यांचे रहाते घर हे समाजकार्यासाठी मंडळाला द्यावे अशी विनंती त्यांच्या वारसांना केली. लागलीच त्यांचे कायदेशीर असणारे वारस सुरेश झिमा झोरे, आकाश हरिश्चंद्र झोरे, अविनाश हरिश्चंद्र झोरे, अक्षय हरिश्चंद्र झोरे व आदित्य हरिश्चंद्र झोरे यांनी त्यांच्या मालकी हक्कातील घर हे कोणताही स्वार्थ न ठेवता मोठ्या मनाने खेमजाई नवतरुण मित्र मंडळ, खेमवाडी या सार्वजनिक मंडळास सामाजिक बांधिलकी जपून बक्षीसपत्राद्वारे दान केले आहे. त्यांनी केलेल्या या समाजउपायोगी योगदानाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्यांनी समाजासाठी दाखविलेली ही उद्दात भूमिका सर्व तरुण पिढी साठी प्रेरणादायी अशीच आहे. त्यासाठी खेमजाई नवतरूण मित्र मंडळ व ग्रामस्थ खेमवाडी यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

> **आजकालच्या स्वार्थी जगात कोणी कोणाला पाणी सुद्धा फुकट देत नाही. परंतु अशाप्रकारे आपल्या पूर्वजांचे स्वतःच राहते घर हे समाजसेवेसाठी व सार्वजनिक कार्यक्रम करण्यासाठी उपयोगी पडत असेल तर त्याहून सुंदर गोष्ट आपण आपल्या पूर्वजांना देवूच शकत नाही. समाजातील तरुणांनी खरच या गोष्टींचा आदर्श घेवून काम केले पाहिजे.**
> **-बाळासाहेब धायगुडे, खजिनदार, खेमजाई नवतरुण मित्र मंडळ- खेमवाडी व अध्यक्ष टिकेडिके परिसर विकास संघर्ष समिती ताडगाव.**

हे समाज उपयोगी काम पूर्ण व्हावे व खेमवाडी गावासाठी आपल्या हक्काची जागा मिळावी म्हणून खेमजाई नवतरून मित्र मंडळाचे अध्यक्ष कैलास खताळ, खजिनदार बाळासाहेब धायगुडे, सचिव मंगेश खताळ, उपसचिव भगवान झोरे, ग्रामपंचायत सदस्य. अनंत धायगुडे, उमेश खाताळ, व सर्व मंडळाचे सदस्य यांनी मोलाची कामगिरी केली आहे



## रोह्यात वाहनधारकांचा बेशिस्तपणा

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा बाजारपेठेला समस्येने ग्रासले आहे. ती समस्या म्हणजे पार्किंग व वाहतूक समस्या. त्यामध्ये वाहनचालकांचा बेशिस्तपणा दिसून येत असून वाहतूक पोलिसांची रोजची दंडात्मक कारवाई सुरू असून तरीदेखील पार्किंग समस्या मात्र कायम असल्याचे दिसून येत आहे.

रोहा बाजारपेठ सातत्याने बाजारपेठ ही नेहमीच गजबजलेली असते. या ठिकाणी असलेले रेल्वे स्टेशन यामुळे नागरीकरण वाढत आहे. रोहा शहराच्या आजूबाजूला असलेल्या चणेरा, तळा, घोसाळे, भालगाव, परिसरातील नागरिक रोह्यात चांगल्या सोयीसुविधा मिळत असल्याने काही ठिकाणी घर घेऊन राहत आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे वाहतूक समस्या सुद्धा निर्माण झालेली आहे. रोहा स्थानिक परिसरात बेशिस्तपणे वाहनचालक, मालक वाहने उभे करीत आहेत. एकंदरीत वाहन चालकांच्या शिस्तीचा अभाव दिसून येतो त्यामुळे पोलीस खाते तर त्यांच्या पद्धतीमध्ये कारवाई व उपाययोजना करीत आहेत मात्र वाहनधारकांनी स्वतःला शिस्त लावून घेणे गरजेचे आहे.

## महिलांची आगळीवेगळी महाआरती



। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा शहरात नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने श्रीराम सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा मंडळाच्या महिला विभागातर्फे आयोजित महिला महाआरती व कुंकूमार्चन कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. तब्बल ३०० ते ३२५ महिलांच्या सहभागातून महाआरती तर सुमारे १०० महिलांच्या उपस्थितीत कुंकूमार्चन विधी पार पडला. सलग तिसऱ्या वर्षी असे उपक्रम यशस्वीपणे राबवून म्हसळा तालुक्याच्या सांस्कृतिक जडणघडणीत महिलांचे योगदान अधोरेखित करण्यात आले.

श्रीराम मंडळ हे म्हसळ्यातील प्रतिष्ठित व नावाजलेले मंडळ असून मागील तीन वर्षांपासून महिला महाआरतीचे आणि कुकूंमार्चन कार्यक्रमाचे नियोजन महिला सदस्यांद्वारेच केले जाते.

त्यामध्ये कार्यक्रमाचे वेळापत्रक आखणे, निमंत्रण पत्रिका वाटणे, आरतीसाठी रांगा लावणे, प्रसाद वितरण करणे, सूत्रसंचालन करणे आदी सर्व जबाबदाऱ्या महिलांचे वेगवेगळे गट पार पाडतात. रात्री गरबा रसिकांसाठी लकी ड्रॉ, लहान मुलांना भेटवस्तू वाटप करणे यांसारखे आकर्षक कार्यक्रमही घेण्यात येतात. यावर्षी कुमारी मनाली समीर करडे हिने तबला वादन करून महाआरतीत विशेष रंगत आणली.

यावर्षी महेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक कुंकूमार्चन कार्यक्रम घेण्यात आला. नवरात्रातील घटस्थापना, कुमारिका पूजन व सौभाग्यवती पूजनप्रमाणेच कुंकूमार्चन हा देवीपूजेचा महत्त्वाचा विधी असून देवीच्या कृपेसाठी याला विशेष स्थान मंडळाच्या तसेच शहरातील सर्व महिलांनी यामध्ये सहभाग घेतला. महिलांनी विशेष परिश्रम घेतले.

धार्मिक विधीच्या पलीकडे जाऊन हे उपक्रम महिलांच्या संघटनक्षमता, नियोजनकौशल्य, स्वावलंबन व नेतृत्वगुणांचे दर्शन घडवतात. नवरात्रोत्सव केवळ पूजा-अर्चनेपुरता मर्यादित न राहता समाजातील महिलांना एकत्र आणणारा व आत्मविश्वास वाढवणारा सण ठरू शकतो,फ्र असा संदेशही या महाआरतीतून आणि कुंकूमार्चन कार्यक्रमातुन मिळाला.

शहरातील नागरिकांनी या उपक्रमांचे मनःपूर्वक कौतुक करत महिलांच्या सामूहिक कार्यपद्धतीचा गौरव केला. या महिला महाआरती व कुंकूमार्चन कार्यक्रमामुळे म्हसळ्यातील श्रीराम सामाजिक सांस्कृतिक व क्रीडा मंडळ नवरात्रोत्सवाला एक वेगळीच ओळख व अभिमान प्राप्त झाला आहे.

## सावरोली मार्गावर पडले खड्डे

**पाताळगंगा :** सावरोली - खारपाडा रस्त्याचे काम काही वर्षापूर्वी झाले. मात्र साईड पट्टी खचणे किंवा रस्त्यावर खड्डे, मोऱ्या खचणे असे प्रकार या मार्गावर घडत आहे. यामुळे नियोजित वेळेवर पडलेले खड्डे भरले नाही तर ते मोठे होत असतात. परिणामी दिवसा अथवा रात्रीच्या वेळी अपघातांची समस्या गंभीर होत असून काही वेळा हा प्रवास जीवावर बेतू शकतो. अपघात झाल्यावर दुरुस्ती करणार की काय असा सवाल प्रवासी वर्गाकडून व्यक्त होत आहे.त्याच बरोबर या गावोगावी गतिरोधकाचा आभाव दिसून येत असल्यांचे पाहावयांस मिळत आहे. हा रस्ता डांबरिकरण झाल्यामुळे उत्तम प्रकारे असल्यांने अनेक वहाने अति वेगाने वाहन चालवित आहे.पावसाळ्यात काही ठिकाणी खड्डे पडले रस्त्यावर खड्डे पडले असल्याची माहिती नसल्यामुळे समोर खड्डा आल्यामुळे गाडीवर नियंत्रण मिळविणे अवघड होत असते. अशावेळी अपघात होण्याची शक्यता निर्माण होवू शकते.

## हरवलेले मोबाईल नागरिकांना केले परत



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामानिमित्त आलेल्या नागरिकांचे प्रवासादरम्यान, खरेदीच्या वेळी व इतर कारणास्तव त्यांचेकडील वापरते मोबाईल फोन गहाळ झाल्याबाबत विविध पोलीस ठाण्यांकडे प्रॉपर्टी मिसिंग तक्रार दाखल होत आहेत. अशा गहाळ झालेल्या मोबाईल फोनमध्ये फोन धारकाचे, नातेवाईक, मित्र व परिचित इसमांचे संपर्क क्रमांक, फोटो, व्हिडीओ, मेसेज इत्यादी स्वरूपाने त्यात आठवणी जतन केलेल्या असल्याने मोबाईल गहाळ होणे हा संबंधीत मोबाईल धारकांसाठी भावनिक विषय देखील आहे.

गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा शोध घेण्याकरीता शासन स्तरावर पोर्टल कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह. आयुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांनी पोर्टलचा प्रभावी वापर करून गहाळ झालेले मोबाईल फोन परत मिळविण्याचे अनुषंगाने कार्यवाही करण्याचे आदेशित केले होते. गुन्हे शाखा कक्ष ३, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अविनाश काळदाते यांनी विशेष पथक स्थापन करुन समांतर शोध सुरु केला. पो. हवा इंद्रजित कानु, गुन्हे शाखा कक्ष ३ यांनी पोर्टलवरुन प्राप्त माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन संबंधीत सिमकार्ड धारकांना फोन करून त्यांना विश्वासात घेवून मागील तीन महिन्यात महाराष्ट्र व परराज्यातुन शोधुन आणलेले २५ लाख रूपये किमतीचे विविध कंपन्यांचे एकुण १२२ मोबाईल फोन सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) अजयकुमार लांडगे यांच्या हस्ते संबंधीत मोबाईल धारकांना आज परत केले आहेत. सदर कामगिरीबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## राबगाव येथे श्री दुर्गामाता महादौडचे आयोजन

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

राबगाव येथे शारदीय नवरात्रौत्सवानिमित्त घटस्थापना ते विजयादशमी या दिवसात गावातील श्री शिवस्मारक ते श्री वरदायिनी मंदिर अशी श्री दुर्गामाता दौडचे आयोजन केले आहे.

श्री शिवछत्रपतींच्या उण्यापुऱ्या आयुष्यात देव, देश, धर्म यासाठी क्षणाचाही विसावा न घेता केवळ हिंदू धर्मासाठी, हिंदू समाजासाठी श्री शिवछत्रपती अखंड दौडले, लढले, झगडले. त्यांच्या रक्तातील आग, रग, धग, लढाऊपणा आजच्या तरुण पिढीच्या रक्तात येणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून नवरात्रौत्सवात प्रत्येक दिवशी पहाटे शेकडो तरुणांनी एकत्र येऊन देवीची उपासना करणे ही आपली हिंदू संस्कृती आहे. शिरावर ध्वज रुपी भगवा फेटा किंवा वारकरी टोपी घालुन ज्या ठिकाणी देवीची स्थापना असेल अशा जागी एकत्र येऊन. एक धारकरी परम पविन श्री भगवा ध्वज हातात धरेल. प्रेरणा मंत्र म्हणायचा आणि त्याच्यामागे सर्वजण आई श्री जगदंबेचा, श्री भवानी मातेचा, श्री शिवरायाचा, हिंदू धर्माचा जय जय कार करून दौड काढण्यात येते.

## तरूणाला मारहाण

**पनवेल :** किरकोळ वादातून तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली. तानाजी सुपेकर हा कामोठे येथे राहत असून तो नीरज हेअर सलून या दुकानात दाढी कटिंगसाठी आला असता वादातून नवनाथ ढाकणे याने मीरा, ओमकार आणि एक अनोळखी इसमाच्या सहाय्याने तानाजी सुपेकर याला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.

पान १ वरून

## हायअलर्ट

दरम्यान, आता मुसळधार पावसापेक्षाही मोठं संकट येण्याचा धोका निर्माण झाला आहे. वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकडाटासह सुरू असलेला मुसळधार पाऊस असाच सुरू राहिल्यास राज्यातील अनेक भागांमध्ये पुन्हा एकदा पूरस्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे. पुरामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकतं. संभाव्य परिस्थिती लक्षात घेता, १७ जिल्ह्यांसाठी आपात्कालीन संपर्क क्रमांक जारी करण्यात आले आहेत.

## मराठवाड्यात पावसाचे थैमान

रस्ते बंद झाले. नदी, नाले यांनी प्रवाह बदलले होतेच, शनिवारी पाणी पसरतच गेले. गोदावरी, हिंगोलीमध्ये कयाधू, बीड, लातूर आणि धाराशिवमधून जाणाऱ्या मांजरा नदीला पुन्हा पूर आला. या पावसाळ्यात मराठवाड्यातील २८५७ गावांत शेती बाधित झाली आहे. जूनपासून आतापर्यंत मराठवाड्यात पावसाने ९० बळी घेतले आहेत.

अनेक भागांत राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकास बोलवावे लागले. पुन्हा एकदा परंडा तालुक्यास पुराने झोडपले. नांदेड, बीड शहरात पाणी घुसले. शाळा आणि अगदी पोलीस ठाण्यापर्यंत पाणी शिरले. मराठवाड्यात लातूर, नांदेड जिल्ह्यातील शाळा व शिकवणी वर्गास शनिवारी सुट्टी देण्यात आली होती. जायकवाडी धरणातून रविवारी सायंकाळी ३७ हजार प्रति सेकंद घनफूट वेगाने पाणी सोडण्यात येत होते. पाण्याचा प्रवाह लक्षात घेऊन धरण ९६ टक्क्यापर्यंत कमी करण्यात आले आहे.

**परभणी, नांदेडमध्ये पूर**

गोदावरी आणि सिंदफना नदीमुळे परभणी व नांदेड जिल्ह्यात पूर आला असून, नांदेड-हैदराबाद या प्रमुख मार्गासह जिल्हाभरातील अनेक मार्गांवरील वाहतूक बंद झाली. कंधार तालुक्यातील सावळेश्वर येथे वीज कोसळून पांडुरंग निवृत्ती कदम (वय ४७) या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. मुखेड तालुक्यातील भवानी तांडा येथील शेतकरी जयराम धनाजी पवार यांच्या ३५ शेळ्या शुक्रवारी सायंकाळी वाहून गेल्या.

**शाळेत चार फूट पाणी**

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील अहमदपूर राष्ट्रीय महामार्गावरील लाडझरी येथे पावसाचे पाणी जिल्हा परिषद शाळेत चार फूट पाणी साचले. बडेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतही पाणी शिरले. बीड शहरातील सखल भागामध्ये पाणी साचल्याने शहरालाच नदीचे स्वरूप आल्यासारखी स्थिती होती.

लातूर जिल्ह्यात चाकूर, निलंगा आणि औसा तालुक्यात पावसाचा जोर वाढला. अनेक ग्रामीण रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यातील जवळपास १७ ग्रामीण रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले.

माजलगाव धरणातून सिंदफणा नदी पात्रात धरणाचे ११ दरवाजे उघडत ४२००० प्रतिसेकंद घनफूट वेगाने विसर्ग केला जात आहे. केजमधील धनेगाव येथील मांजरा धरणाचे ६ दरवाजे उघडत नदीपात्रात २७१६६ प्रतिसेकंद घनफूट वेगाने पाणी सोडले जात आहे.

## शेतकरी हवालदिल

पहिल्या आठवड्यात आलेला पाऊस पाच महिने मुक्काम ठोकून आहे. लवकर आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना भाताची रोप तयार करता आली नव्हती.त्यानंतर ज्यांनी रोप तयार केली त्यांना आता लांबलेल्या पावसाने झोडपून टाकले आहे. कापणीस आलेली भातशेती अक्षरशः भुईसपाट झाली असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. शेतकऱ्यांच्या मेहनतीची वर्षभराची पिके क्षणात पाण्याखाली गेल्याने तालुक्यात हताशा आणि वेदनेचे वातावरण पसरले आहे. तालुक्यातील वारे, कळंब, गरूडपाडा, पोशिर, जमरुख, टेम्भेरे, खांडस, वेणगाव, बारणे गौरकामथ अशा बहुतांश भागात भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. कापणीसाठी सज्ज झालेली भातशेती चिखलात कोसळली असून शेतांच्या बांधांना भगदाड पडल्याने माती वाहून गेली आहे. सध्या शेतकरी डोळ्यादेखत आपली शेती उद्ध्वस्त होताना बघत आहेत. वाढती मजुरी, महाग झालेली बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके या खर्चाचा डोंगर उचलून शेतकऱ्यांनी कसेबसे पिक उभं केलं होतं. पण नैसर्गिक आपत्तीने त्यांच्या स्वप्नांची राख केली. शेती परवडत नाही, त्यातही असा पाऊस म्हणजे डोंगराएवढं संकटच आहे, असे शशिकांत तुरे यांचे म्हणणे अ्रहे. कळंब तसेच गरूडपाडा परिसरातील भातशेती अतिवृष्टीमुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. तलाठी आणि कृषी अधिकारी यांनी तात्काळ पंचनामे करून आम्हाला नुकसानभरपाई मिळवून द्यावी. नाहीतर आमच्यावर निश्चितच उपासमारीची वेळ येईल, असे दशरथ मुने यांनी सांगितले.

मागील वर्षी अशाच प्रकारे भाताचे पिकाची नासाडी झाली होती. त्यानंतर मे महिन्यात पाऊस आल्याने आमच्या राजनाला कालवा असलेल्या परिसरातील किमान एक हजार एकर जमिनीमधील भातपिकाची कापणी न करता तसेच सोडून द्यावे लागले होते. त्यानंतर कडधान्य पाण्यात भिजून गेल्याने शेतकऱ्यांच्या हाती काहीही लागले नव्हते. असे विनय वेखंडे यांचे म्हणणे आहे.

## वीज कोसळून पाच जखमी

खरशेत गोवारीपाड्यातील वीज पडल्यामुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून अहवाल तहसीलदार कार्यालयाला पाठवल्याची माहिती मासवण तलाठी सजेच्या तलाठी तेजल राऊत यांनी दिली.

दरम्यान, रात्रभर सुरू असलेल्या पावसामुळे जव्हार-विक्रमगड रस्त्यावरील पाचमाड-चिंचघरदरम्यानचा पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक एक ते दीड तास बंद झाली होती. पाणी ओसरल्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू झाली आहे.

## शेकडो मशालींनी उजळला किल्ले प्रतापगड

यंदा शनिवारी आलेल्या या तिथीनुसार हा महोत्सव साजरा झाला. भवानी मातेची शनिवारी रात्री विधिवत पूजा व गोंधळ झाल्यानंतर ढोल ताशांच्या गजरात जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या जयघोषात मशाली प्रज्वलीत करण्यात आल्या. नगारे, तुतारी, सनई यांच्या मंगलवाद्यात एकेक मशाल पेटत गेली आणि त्यामध्ये गड उजळत गेला. हा कार्यक्रम रात्री उशिरा पर्यंत सुरु होता. या वेळी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली. भवानी माता मंदिर ते माचीवरील ध्वज बुरुजापर्यंत तटावर या मशाली लावण्यात आल्या. मशालींमुळे गड व परिसर उजळून निघाला. यावेळी किल्ल्याच्या चहूबाजूंनी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रात्रीच्या अंधारात माशालींच्या उजेडाने उजळून निघालेला हा गड कॅमेऱ्यात टिपण्यासाठी कार्यकर्ते, भाविकांची धडपड सुरू होती. भाविक व कार्यकर्त्यांसाठी ग्रामस्थांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

मागील अनेक वर्षांपासून येथील हस्तकला केंद्राचे चंद्रकांत आप्पा उतेकर, संतोष जाधव, अभय हवलदार, स्वराज्य ढोल पथक, माय भवानी सामाजिक संस्था, स्वस्तिक ग्रुप, डान्सर पालघर, शिवमुद्राकन प्रतिष्ठान पोलादपूर, प्रतापगड व वाडा कुंभरोशी ग्रामस्थांकडून गडावर या मशाल महोत्सवाचे आयोजन केले जात आहे.

## उरणमध्ये घरांची पडझड

आपत्कालीन व्यवस्थापन हे पडझड झालेल्या चिरनेर गावातील रहिवाशांच्या घरांची पाहणी करण्यासाठी किंवा आडवी पडलेल्या शेतीची पाहणी करण्यासाठी बांधावर न आल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

उरण तालुक्यात शनिवारी आलेल्या वाऱ्याच्या पावसामुळे कापणीसाठी आलेली भातशेती आडवी पडली. घरांचीही पडझड झाली असताना शासकीय आपत्कालीन व्यवस्थापन मदतीसाठी पुढे येत नसतील तर ही शोकांतिका आहे. तरी शासनाने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सहकार्य करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच उरण तालुक्यातील आपत्कालीन व्यवस्थापनाच्या काम चुकार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. असे संतोष ठाकूर यांचे म्हणणे आहे.

## पावसाचा कहर सुरुच

मुसळधार पाऊस आणि गडगडाटी वादळाची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

रायगड जिल्हयात रविवारी अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याने दिला होता. त्यानुसार जिल्हयात पावसाने जोरदार एंट्री मारली. अलिबाग, कर्जत, सुधागड , माणगाव , माथेरान , पेण, उरण, श्रीवर्धन, सुधागड, म्हसळा या भागात ८० ते १०२ मि.मी. इतका पाऊस पडला. सर्वात जास्त माणगांव, अलिबाग, पेण तालुक्यात पाऊस पडला. त्या खालोखाल कर्जत, तळा, मुरुड, रोहा, महाड, पोलादपूर, खालापूर अशा अनेक शहरी व ग्रामीण भागात ४१ ते ८० मि. मी पाऊस पडला.

शनिवारी रात्रीपासून पाऊस सुरु राहिल्याने शेतांसह अनेक सखल भाग पाण्याने भरून गेला. पावसामुळे नागरिकांचे प्रचंड हाल झाले. जिल्ह्यातील अलिबाग-पेण, अलिबाग-रोहा, अलिबाग-चणेरा तसेच अलिबाग मुरुड मार्गावर असलेल्या खडड्यांमध्ये पाणी साचले. त्याचा वाहतुकीवर परिणाम झाला. वाहतुकीचा वेग मंदावल्याने प्रवाशांना त्यांच्या निश्चित स्थळी पोहचण्यास विलंब झाला. एसटी सेवेवरही त्याचा परिणाम झाला.

सावित्री, अंबा, कुंडलिका, पाताळ गंगा, उल्हास या प्रमुख नद्या पाण्याने भरून गेल्या. इशारा पातळी पेक्षा कमी पाणी आहे. जिल्हयातील लघु पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या २८ धरणांपैकी २६ धरणे शंभर टक्के जलसाठा असून श्रीवर्धन मधील कार्ले आणि रानिवली धरणात ९९ टक्के जलसाठा असल्याची माहिती देण्यात आली आहे. कर्जत, अलिबाग, नागोठणे हा भाग जलमय झाला आहे .

जिल्ह्यात सोमवारी (दि.२९) ऑरेंज अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. संभाव आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासनाने तयारी केली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. जिल्ह्यात भात पिक तयार होण्याच्या मार्गावर आहे. कणश्या तयार होऊ लागल्या आहेत. परंतू गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे भातपीक संकटात आले आहे. हातातोंडाशी आलेला घास जाण्याची भीती निर्माण झाली आहे, असे प्रभाकर नाईक यांनी सांगितले.

## सुधाकर घारे यांची सर्वोच्च न्यायालयात धाव

सुधाकर घारे यांनी आपला विजय होत नाही तोवर लढा दिला जाणार असून आपला न्यायालयावर विश्वास असून सत्याच्या बाजूचा विजय उशिरा होईल पण विजय होईलच असा विश्वास व्यक्त केला आहे. मुंबई उच्च न्यायालयात सुधाकर घारे यांच्याकडून नामांकित वकील अ‍ॅड. आरिफ बुकवाला, अ‍ॅड. महेक बुकवाला, अ‍ॅड. पूजा थोरात यांनी बाजू मांडली होती.मात्र सर्वोच्च न्यायालयात सुधाकर घारे यांच्याकडून कोणत्या नामांकित वकिलांवर जबाबदारी दिली आहे. हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

## ग्रामीण कथाकार प्रा. भास्कर चंदनशिव यांचे निधन

पुरस्कारांनीही त्यांना गौरवण्यात आले होते.

प्रा. चंदनशिव यांनी उस्मानाबादेत आयोजित २८ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे, इस्लामपूर येथे भरलेल्या शेतकरी संघटनेच्या पहिल्या ग्रामीण संमेलनाचे अध्यक्षपद भूषवलेले आहे. मराठी साहित्य अकादमीचे, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. प्रा. चंदनशिव यांनी कथासंग्रहासह संपादन, समीक्षा प्रांतातील साहित्य लेखन केले आहे. अंबाजोगाईत शिक्षण आणि वैजापूर, गंगापूर, बीड येथील महाविद्यालयात त्यांनी मराठी विषय अध्यापनाचे कार्य केले. त्यांचे साहित्य महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठात अभ्यासक्रमाला लागलेल्या आहेत. त्यांची लाल चिखल ही कथा अनेक रूपाने वाचक व साहित्याचे अभ्यासक यांच्या मनात कायम कोरली गेली आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त धडकताच साहित्य वर्तुळात शोककळा पसरली.

## एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

धर्मवीर संभाजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था निजामपूर माणगाव येथे एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव संपन्न झाला. पंडित दीनदयाळ यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाचे प्राचार्य धीरज ठाकूर, प्रमुख वक्ते अजित शेडगे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.धर्मवीर संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अजित शेडगे यांनी एकात्म मानव दर्शन या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी एकात्म भाव असलेला मनुष्य धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ साध्य करतो. कर्तव्य पालनात राष्ट्रहिताला सर्वोच्च मानले पाहिजे.आपण हक्कासोबत कर्तव्य पालनही केले पाहिजे.

व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या पातळ्यांवर समन्वय साधला तरच राष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल आदी विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य धीरज ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रेरणा दिली.

# निवडक



## मुरूडमध्ये ९७ मिमी पावसाची नोंद

**आगरदांडा :** गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने गेले दोन दिवस पुन्हा धो-धो सुरूवात केल्याने ऐन नवरात्रोत्सवात जनजीवन विस्कळित झाले असून बाजारपेठा देखील ठप्प झाल्या आहेत. भारतीय हवामान विभागाकडून महाराष्ट्राच्या किनारपट्टीलगतच्या जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीलगत ४९ ते ५० किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून वाऱ्याचा हा वेग ६० किमी प्रतितास एवढा वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व बंदरांवर स्थानिक सावधानतेचा इशारा देण्यात आलेला असून सर्व मच्छीमार सहकारी सोसायटींना कळविण्यात आले आहे. यावेळी मच्छीमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये, असे आवाहन मुरुड परवाना मत्स्यव्यवसाय विभाग अधिकारी अक्षय साळुंखे यांनी केले आहे. गेले दोन दिवस तुफानी वाऱ्यांसह पाऊस धो-धो पडत असल्याने दोन दिवसांत मुरूड तालुक्यात ९७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. आतापर्यत एकूण २,५२६ मिमी पावासाची नोंद झाली असल्याची माहिती मुरूड तहसीलदार कार्यालयातील संदेश वाळंज यांनी दिली आहे. मुरूड-खारअंबोली गावातील शेतकरी मनोज कमाने यांनी सांगितले की, मुरुड शहरासह पंचक्रोशी भागात यंदा शेतीयुक्त पाऊस चांगला पडला असला तरी आता पडणारा पाऊस शेतीला धोका देऊ शकतो. हा पाऊस भाज्यांच्या मळ्यांना व बागायतदारांना नुकसान करु शकतो, अशी प्रतिक्रिया कमाने यांनी दिली आहे.

## झाडेझुडपे अपघाताला आमंत्रण



**कोर्लई :** मुरुड-साळाव रस्त्यालगत मोठ्या प्रमाणावर झाडेझुडपे वाढली आहेत. अनेक ठिकाणच्या वळणांवर असलेल्या झाडाझुडुपांमुळे वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागत आहे. मुरुडमधील परेश नाका ते राजवाडा विहूर दरम्यानच्या वळणावर असलेल्या झाडाझुडपांमुळे समोरून येणारे वाहन दिसत नाही. त्यामुळे वेळप्रसंगी याठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. नुकताच याठिकाणी पीकप टेम्पो व एसटीबसचा भीषण अपघात होऊन तेरा जण जखमी झाले आहेत. त्यामुळे संबंधित बांधकाम खात्याने यात तातडीने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी पर्यटक, प्रवासी व नागरिकांतून केली जात आहे.




## ज्येष्ठ नागरिक वाचन कट्ट्याचे उद्घाटन

**अलिबाग :** प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांनी लक्ष्मी बाग म्हाडा कॉलनी येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचन कट्ट्याचे उद्घाटन केले. त्यामध्ये २५ पुस्तके देऊन ती वाचून झाल्यानंतर आठ दिवसांनी पुन्हा नवीन पुस्तके त्यांना देण्यात येणार आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक वर्गामधून आनंद व्यक्त करण्यात आला. तसेच, ही सेवा घरपोच मिळाल्याने सगळे आनंदित झाले होते. कथा कादंबऱ्या व धार्मिक ग्रंथ असे ग्रंथ वाचायला मिळणार असल्याने ज्येष्ठ नागरिकात आनंद निर्माण झाला व वाचनाची आवड पुन्हा एकदा जोपासता येईल, असेही सर्व ज्येष्ठ नागरिकांनी भावना व्यक्त केली.

## रेवदंडा अर्बन बँकेची सर्वसाधारण सभा

**रेवदंडा :** दि. रेवदंडा को-ऑप. अर्बन बँक लि. रेवदंड्याची ९६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. या सभेत मोठ्या संख्येने बँकेचे सभासद उपस्थित होते. ही सभा रेवदंडा अर्बन बँकेच्या सभागृहात शनिवार (दि.२७) बँकेचे चेअरमन नजमुस्साकिब म.अ. लांबाते यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी व्हाईस चेअरमन धरती निलेश राउत, संचालक वामन घरत, प्रभाकर नाईक, जाकिरअली हसवारे, सतिश लेले, आरती मढवी, गजानन झेंडेकर, अंजनकुमार तांबडकर, अरूण म्हात्रे, महेंद्र पाटील, मंगेश परभाळे, निलेश गाडे, तज्ज्ञ संचालक शादाअ काटे आदींची उपस्थिती होती.



# मोकाट गुरांना वेसण घाला रे..

## || स्थानिक नागरिकांची ओरड || रस्त्यातच बसल्यामुळे अपघाताला आमंत्रण

**| धाटाव | प्रतिनिधी |**

रोहा-कोलाड मार्गावर मोकाट गुरांची वाढती संख्या अपघाताला कारणीभूत ठरत आहे. या रस्त्यावर जवळपास ४० ते ५० मोकाट गुरे बस्तान मांडत असल्याने रहदारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रस्त्यावरील अवजड वाहनांसह इतर चारचाकी व दुचाकीची चालकांना मोठा अडथळा निर्माण होत आहे. तसेच, वाहतूक कोंडीचा प्रश्न देखील भेडसावत आहे. गेल्या तीन महिन्यांपासून रस्त्यावरील ही मोकाट गुरे रहदारीला डोकेदुखी ठरत असल्याने या मोकाट जनावरांना वेसण घाला रे, असे म्हणण्याची वेळ आता स्थानिक नागरिकांवर आली आहे.



### गुरे मालकांवर कारवाईची मागणी

**रोहा-कोलाड रस्त्याच्या मधोमध ग्रामीण भागातील गुरे बसलेली दिसतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अपघात वाढत आहेत. या गुरांच्या मालकांनी घरी शांत झोपून गुरांना रस्त्यावर मोकाट सोडून देणे चुकीचे आहे. सर्वत्र गुरे चोरांची भीती असूनही मुक्या प्राण्यांना रस्त्यावर मोकाट सोडणाऱ्या मालकांवर संबंधित प्रशासनाने कारवाई करणे गरजेचे आहे, असे स्थानिक नागरीकांकडून बोलले जात आहे.**

रोहा-कोलाड मार्गावरून दररोज हजारो वाहनांची वर्दळ सुरू असते. मुंबई पुण्यासारख्या ठिकाणाहून मुरूड व अलिबाग सारख्या पर्यटन स्थळी जाण्यासाठी हाच मार्ग सोयीस्कर आहे. त्यामुळे या मार्गावरून पर्यटकांचीही मोठी ये-जा आहे. त्यातच सध्या नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात सर्वत्र साजरा होत असताना प्रत्येक जण आपआपल्या कुलदेवतेच्या दर्शनानासाठी या मार्गावरून जात आहेत. धाटाव औद्योगिक वसाहतीत कारखाने असल्याने अवजड वाहनेही भरधाव जात आहेत. त्यातच या महामार्गावरील मोकाट गुरांची वर्दळ डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे रोहा-कोलाड रस्त्यावर मोकाट गुरांचा वाढता वावर ही एक गंभीर समस्या बनली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी, अपघात आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे.

ही मोकाट गुरे रस्त्यावर ठाम मांडून बसत असल्याने भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनचालकांना त्वरित वाहन नियंत्रणात आणणे शक्य होत नाही. त्यामुळे मोठा अपघात होऊन अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. तर, काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. तसेच, अनेकांना आर्थिक बाबीलाही सामोरे जावे लागले आहे. तरी देखील संबंधित प्रशासन या मोकाट गुरांकडे कानाडोळा करीत असल्याने वाहनचालक व प्रवासी संताप व्यक्त करत आहेत. या मोकाट गुरांचा बंदोबस्त करून वाहन चालकांसह प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्यासाठी उपाययोजना राबवण्यात यावी, अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

> **आम्ही रोजगारासाठी औद्योगिक वसाहतीत कारखान्यात तीनही शिफ्टमधे काम करीत असतो. रोहा-कोलाड रस्त्यावर सतत मोकाट गुरांचा ठिय्या बसलेला असताना रस्ता मोकळा नसल्याने वाट काढून जावे लागते. मात्र, रस्त्यावर फिरणाऱ्या गुरांमुळे कामगारवर्ग व शाळकरी मुलांना जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागत आहे. - रामेश्वर वडले, सुरक्षा कर्मचारी**

दरम्यान, अनेक ठिकाणी गुरे चोरांच्या टोळ्या ही सक्रीय असल्याची भीती असतानाही बिनधास्तपणे गुरे रस्त्यावर सोडली जातात. गुरे मालकांच्या निष्काळजीपणा आणि संबंधित प्रशासन या सर्वाला कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे मोकाट जनावरांना आता वेसण घाला रे, असे म्हणण्याची वेळ स्थानिक नागरिकांवर आली आहे.

## मोहाचीवाडीत रक्तदान शिबीर संपन्न



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील नेरळ-मोहाचीवाडी येथील युवा मित्र मंडळाच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. येथील श्री साईबाबा मंदिर संस्थानात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मंडळाच्यावतीने सलग १७व्या वर्षी या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. युवा मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, उपाध्यक्ष धनाजी डबरे, लक्ष्मण मिरकुटे, सचिव मंगेश भवारे, विवेक चव्हाण तसेच खजिनदार सूरज साळवी, शुभम कालेकर यांच्या उपस्थित रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. रक्त संक्रमण माया ब्लड बँकेच्या श्वेता बागुल, प्रियांका धायके, मनीषा आकांक्षा गोळे, पालकर यांच्या पथकाने केले. यर शिबिरात ३५ रक्तदात्यांनी रक्तदानाचे पवित्र कार्य केले.

# स्मशानभूमीच्या दुरवस्थेमुळे तारांबळ

## भरपावसात ताडपत्री बांधून अंत्यविधी

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील नेहरूनगर बाईतवाडी गावातील स्मशानभूमी २०२३च्या चक्रीवादळात उध्वस्त झाली. स्मशानभूमीचे लोखंडी पोल पडले असून छप्पर देखील उडाले आहेत. त्यामुळे स्मशानभूमीच्या पायाभूत सुविधा पूर्णपणे बंद झाल्या आहेत. याला दोन वर्षे होऊनही अद्याप प्रशासनाने स्मशानभूमीची कोणतीही दुरुस्त केलेली नाही. त्यामुळे दोन दिवस होत असलेल्या तुफान पावसात एका महिलेच्या अंत्यविधीसाठी गेलेल्या ग्रामस्थांना भर पावसात उभं राहून स्मशानभूमीवर ताडपत्री बांधून अंत्यविधी करावे लागले. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.



याविषयी येथील ग्रामस्थांनी ग्रामपंचायत, आमदार, खासदार व लोकप्रतिनिधी यांना वेळोवेळी लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. परंतु, प्रशासन गावातील मूलभूत गरजांकडे लक्ष देत नसून त्यांनी ग्रामस्थांना केराची टोपली दाखवली असल्यामुळे ग्रामस्थांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. त्यामुळे शासनाने त्वरित स्मशानभूमीची दुरुस्ती करावी, सुरक्षित रस्ता तयार करावा तसेच मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्यावा अन्यथा ग्रामस्थांकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## कचरा टाकणाऱ्यांवर कारवाईची मागणी

**| आपटा | प्रतिनिधी |**

मोहपाडा बाजारपेठेतील भाजी विक्रेते फेरीवाले आणि व्यावसायिक संध्याकाळी आपला सर्व कचरा मोहपाडा येथील मुख्य रस्त्यावरील मुतारीच्या समोर टाकून देतात. त्यामुळे मोहपाडा परीसरातील सर्व गुरेढोरे याठिकाणी गर्दी करतात. तसेच, या कचऱ्यामध्ये प्लास्टिक सारख्या घातक वस्तू असल्याने गुरांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आह. तरी याबाबत वासांबे मोहपाडा ग्रामपंचायतीने या ठिकाणी कचरा टाकणाऱ्या व्यावसायीकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# रायगड फोटो एक्स्पो संपन्न



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड फोटोग्राफर्स अँड व्हिडीओ ग्राफर्स असो.च्यावतीने जिल्ह्यातील छायाचित्रकारांना नवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे, छायाचित्रणा संदर्भात लागणाऱ्या वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्या, या उद्देशाने सलग दुसऱ्या वर्षी 'रायगड फोटो एक्स्पो'चे आयोजन पेणमधील मराठा समाज हॉल मध्ये करण्यात आले होते. या एक्स्पोचे उद्घाटन जिल्हा उद्योग केंद्राचे जनरल मॅनेजर जी.एस. हरळय्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी असो.चे संस्थापक विवेक सुभेकर, अध्यक्ष समीर भायदे, उपाध्यक्ष समीर मालोदे, सचिव आनंद नींबरे, सहसचिव दीपक बडगुजर, खजिनदार जितेंद्र मेहता, कार्यकारिणी सदस्य अविनाश राऊत, अनिरुद्ध जोशी, सुशिल घाटवळ, निलेश शिर्के, सल्लागार दादा आर्ते, एक्स्पोच्या आयोजनासाठी मेहनत घेणाऱ्या पेण फोटोग्राफर असो.चे अध्यक्ष समाधान पाटील, उपाध्यक्ष संदीप म्हात्रे, सर्व असो.चे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

या एक्स्पोमध्ये मुंबई, पुणे व ठाणे येथील निकॉन, कॅनॉन, फ्युजिफिल्म, रॉयल अल्बम, प्रिंटर, फ्रेम्स, बेबी शूट क्रॉप्स, थ्रीडी बॅग्राऊंड अशा छायाचित्रणासंदर्भात विविध प्रकारचे १८ स्टॉल उपलब्ध करण्यात आले होते. या एक्स्पोचे खास आकर्षण म्हणून रायगड फोटो सुदंरी नावाने फॅशन शोचे देखील आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ छायाचित्रकार प्रकाश सकपाळ, पराग गुप्तन, प्रशिक्षक पराग शिंदे, महेश तावरे यांचा असो. च्यावतीने सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर असो.च्यावतीने घेण्यात आलेल्या 'रंगोत्सव २०२५' या छायाचित्रण स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. यावेळी पेण, अलिबाग, पोयनाड, मुरूड, रोहा, पाली, नागोठणे, खोपोली, कर्जत, नेरळ, माणगाव, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, उरण व रसायनी फोटोग्राफर्स असो.मधून ४६५ छायाचित्रकारांनी या एक्स्पोला भेट दिली. हा एक्स्पो यशस्वी करण्यासाठी पेण फोटोग्राफर्स असो.ने मेहनत घेतली.

## पथदिवे उजळणार श्रीवर्धनचे सौंदर्य

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहर मुळातच नारळी पोफळीच्या बागांनी नटलेले निसर्ग सुंदर शहर आहे. त्यात अधिकची भर घालणारे सौर ऊर्जेवर चालणारे दीडशे पथदिवे व १० हायमास्ट दिवे श्रीवर्धनच्या मुख्य रस्त्यांवर बसविण्यात आले आहेत. ते ऑक्टोबर महिन्यात प्रत्यक्ष प्रकाशमान होणार असल्याची माहिती श्रीवर्धन नगरपरिषदेकडून मिळाली आहे. या सौर पथ दिव्यांबाबत नगरपरिषदेकडून उपलब्ध माहितीनुसार ही योजना भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. दिल्लीकडून प्राप्त झाली असून कार्यान्वित केली जात आहे. या प्रकल्पाची तांत्रिक वैशिष्ट्ये म्हणजे या प्रकल्पात वापरण्यात आलेले ६ मीटर उंचीचे पोल हे मजबूत स्टीलपासून तयार केले असून समुद्री हवामानाला अनुकूल गॅल्वनाईज व खास कोटिंगसह संरक्षित आहेत.

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स लॅबचे उद्घाटन



**| आपटा | प्रतिनिधी |**

बिर्ला कार्बन इंडिया प्रा. लि. पाताळगंगा यांच्या सामाजिक बांधिलकी उपक्रम ंतर्गत उभारण्यात आलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स लॅबचा उद्घाटन समारंभ गुरूवारी (दि.२५) रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आला. बिर्ला कार्बन कंपनीचे युनिट हेड रवींद्र कुमार रघुवंशी यांच्या अध्यक्षतेखाली सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक शाळेत हा समारंभ पार पडला.

यावेळी आंचल दलाल यांनी आपले मार्गदर्शनपर विचार व्यक्त करताना सांगितले की, बिर्ला कंपनीच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स लॅबमुळे चौक व परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान शिकण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. त्यातून निश्चितच विद्यार्थी शिकतील व त्यांना या क्षेत्रात प्रगती करण्याची प्रेरणा मिळेल. या ए.आय. लॅबमुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल युगातील नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची मोठी संधी मिळणार आहे. त्यामुळे चौक परिसरातील शैक्षणिक वातावरणात एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले जात आहे, असे त्या म्हणाल्या.

## बोरखारला कराओके कार्यक्रम

**उरण :** बोरखार येथील दुर्गामाता नवरात्र उत्सव मंडळाच्यावतीने सहाव्या माळीवेळी कराओके या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यात प्रमोद पंढरीनाथ म्हात्रे, प्रांजल पाटील व डॉ. सुभाष घरत हे क्रमांकाचे धनी ठरले. तर इतर गायकांना उत्तेजनार्थाची पारितोषिके देण्यात आली.




नवरात्रोत्सवातील प्रत्येक दिवशीच्या रंगाचे वस्त्र परिधान केलेल्या महिलांचे छायाचित्र कृषीवलमध्ये विनामुल्य प्रकाशित करण्यात येईल. प्रत्येक दिवसाला येणाऱ्या पहिल्या १५ फोटोंना प्राधान्य देण्यात येईल.

सोमवार, दि. २९ मोरपंखी
मंगळवार, दि. ३० गुलाबी
बुधवार, दि. १ जांभळा

नवरात्रौत्सव म्हणजे देवीचा जागर नारीशक्तीचा सन्मान नवरसात,
नवरंगात बहरलेला उत्सव जणू आनंदाला आलेला बहरच
हे नऊ दिवस तुम्हीही साजरे करु शकता कृषीवल रंगशक्ती संगे.

फोटो raigadkrushival@gmail.com येथे पाठवा

### प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ | ॲड. वर्षा घारे यांचे मार्गदर्शन

# वकील होण्याआधी चांगला माणूस असणे गरजेचे

**| खोपोली | प्रतिनिधी |**

ज्ञानाची तहान, गुरूवरची निष्ठा, सतत काहीना काही नवीन शिकण्याची तत्परता, एकाग्रता आणि महत्वकांक्षा हे पाच गुण विद्यार्थ्यांमध्ये असतील तर चांगला विद्यार्थी घडू शकतो. त्यामुळे वकील होण्याआधी चांगला माणूस असणे गरजेचे आहे, प्रतिपादन विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या ॲड. वर्षा घारे यांनी केले आहे. खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ विधी महाविद्यालयरत प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ बी.एल.पाटील तंत्रनिकेतनच्या सभागृहात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.




पुढे त्या म्हणाल्या की, विधी महाविद्यालय सुरू झाल्यापासून खुप आडचणी येत आहेत. परंतु, अशा परिस्थितही संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, कार्यवाह किशोर पाटील व अध्यक्ष नरेंद्र शहा कायम आपल्या सोबत असतीलच, असा विश्वास घारे यांनी व्यक्त केला आहे. यावेळी विधी महाविद्यालयाचे अध्यक्ष नरेंद्र शहा, देवऱ्हावे छत्रपती विद्यालयाचे अध्यक्ष भास्कर लांडगे, ॲड. तनिष्का देशमुख व ॲड. मेघना पोळेकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती पूजन आणि दिपप्रज्वलन अध्यक्ष नरेंद्र शहा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर मागील वर्षी विविध स्पर्धांमधील गुणवंत स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना नरेंद्र शहा यांनी म्हटले की, संस्थेच्या संचालकांनी पाठपुरावा केल्यानंतर विधी महाविद्यालयाला परवानगी मिळाली. त्यावेळी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांवर पूर्ण सुविधा देण्यासाठी कमी पडलो यासंबंधी प्रामाणिकपणे सांगतो. परंतु, पुढील काळात विद्यार्थ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कायम प्रयत्न करेल, असे अश्वासन देत त्यांनी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पुढे बोलताना संचालक भास्कर लांडगे यांनी सांगितले की, विधी महाविद्यालयात प्रबल इच्छा शक्तीच्या बळावर विद्यार्थी अभ्यास करीत आहेत. आपणही नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यास करा, संस्था आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी असेल, असा शब्द त्यांनी दिला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अभिजीत देशमुख तर आभार सचिन घरत यांनी मानले.

# खरे दात दिसू लागले

फडणवीस, पवार आणि शिंदे इतके दिवस स्वतःला लाडक्या बहिणींचे लाडके भाऊ म्हणवून घेत होते. राज्यात नुकत्याच आलेल्या भयंकर पुरामुळे हा मुखवटा गळून पडला आहे. सरकारचा खरा चेहरा आणि खरे दात दिसू लागले आहेत. सालाबादप्रमाणे उपचार म्हणून ही सर्व सरकारी मंडळी मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या सांत्वनाला जात आहेत. मात्र तेथे शेतकऱ्यांनी आकांत केला, प्रश्न विचारले की यांचा तोल जातो आहे. अजित पवार हे स्वतःवर संयम ठेवू शकत नाहीत हे अनेकदा उघड झाले आहे. कितीही वेळा प्रायश्चित्त घेतले व आता पुन्हा असे बोलणार नाही असे ठरवले तरी गर्दी दिसताच यांचे भान सुटतेच सुटते. कालपरवा सोलापूर व लातूरच्या दौऱ्यावर असताना शेतकऱ्यांनी त्यांना कर्जमाफीविषयी विचारले. राज्य विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुतीने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र सत्तेवर आल्यापासून यांची टोलवाटोलवी चालू आहे. बहिणींना पैसे देण्यापायी यांनी बाकीच्या योजनांना घरघर लावली आहे. तिजोरीत खडखडाट आहे. त्यामुळे कर्जमाफी करता येणार नाही हे उघड आहे. पण ते सांगण्याचे धैर्य यांच्यात नाही. त्यामुळे अजितदादा शेतकऱ्यांवरच डाफरत आहेत. पैशाचे सोंग आणता येत नाही असे त्यांनाच उलटे सांगत आहेत. पण पैसे नसताना बहिणींच्या नावाने पैसे उधळून यांनी मते घेतली आणि आता हेच लोकांना अक्कल शिकवत आहेत. या लाडक्या बहिणींच्या नावाने यांच्याच कार्यकर्त्यांनी आणि सरकारी नोकरांनी लाखो अपात्र अर्जदारांना शेकडो कोटी रुपये दिले. त्यांच्याकडून ते वसूल करण्याची हिंमत सरकारमध्ये नाही. तसे केले तर येत्या जिल्हा परिषद व पालिकांच्या निवडणुकांमध्ये फटका बसेल अशी भीती यांना वाटते. आणि, ज्यांनी घरेदारे, गुरेढोरे, शेतातली पिकेच नव्हे तर मातीसुध्दा ज्यांनी गमावली आहे त्या शेतकऱ्यांना पैशांचे सोंग आणता येत नाही असे ब्रह्मज्ञान सांगत आहेत. ते सोंग आणता येत नाही व पावसाने होते नव्हते सगळे धुवून नेले म्हणून तर शेतकरी सरकारकडे आशेने पाहत आहेत.

## दादांनी मंत्रिपद सोडावे

दादांना आपण सकाळी लवकर काम सुरू करतो याचा फार अभिमान आहे. सकाळपासून तुमच्यासाठी इतका दौरा करतोय तर तुम्ही आमचीच मारा असे अत्यंत अश्लाघ्य उद्गार दादांनी एका ठिकाणी काढले. आणखी एका ठिकाणी कर्जमाफीची मागणी करणाऱ्यालाच मुख्यमंत्री करा असे ते म्हणाले. खरे तर इतका जर त्रागा होत असेल तर दादांनी मंत्रिपदच काय राजकारण सोडून घरी बसायला हवे. लोकांनी सर्वस्व गमावले आहे, सरकारने कितीही मदत केली तरी ती त्यांना जन्माला तर सोडाच एक वर्षभरही पुरणारी असेल असे नाही. अशा लोकांशी मंत्री वा अधिकारी यांनी किमान सहानुभूतीने बोलायला हवे. लोक रागावले तरी सहनशीलता ठेवायला हवी. यापूर्वी अजितदादांच्याच पक्षाचे माणिकराव कोकाटे यांना अशाच चीडखोर उद्गारांमुळे कृषीमंत्रिपद गमवावे लागले. मग तोच न्याय दादांनाही का लावला जाऊ नये असा प्रश्न आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही याच लाईनवर जात आहेत. परवा एका शेतकऱ्याने त्यांना हेक्टरी मदत किती देणार हे सांगा असे विचारले तर त्याला राजकारण करू नको असे यांनी धम कावले. पूरग्रस्तांच्या भेटीला जर तुम्ही आलात तर तिथे तुम्ही किती मदत करणार असा प्रश्न विचारला जाणारच. तो विचारणे हे राजकारण होऊ शकत नाही. समजा तो शेतकरी विरोधी पक्षाचा आहे असे गृहित धरले तरी त्याचा प्रश्न राजकीय होत नाही. याच रीतीचा रोकडा सवाल अन्य एका ठिकाणी केल्यावर तो शेतकरी दारु पिऊन आला आहे असे म्हणून पोलिसांनी त्याला बाजूला केले. जोवर शेतकरी योग्य प्रश्न सभ्य भाषेत विचारत आहे तोवर त्याला उत्तर देणे सरकारचे प्रमुख म्हणून यांची जबाबदारी आहे. पण पोलिसी बळाच्या आधारे जनतेचा आवाज असा बंद करणे ही शुध्द हुकुमशाही आहे. आज जनता शांतपणे सवाल करीत आहे. तुमचा सन्मान म्हणून विनंती करीत आहे. पण उद्या यांच्यातला संताप जर वेळीच ओळखला नाही तर तीच जनता तुम्हाला पळता भुई थोडी केल्याखेरीज राहणार नाही.

## शिंदे यांचा प्रचार

एकनाथ शिंदे हे प्रत्येक घटनेकडे प्रचार व प्रसिध्दीची संधी म्हणूनच पाहत असतात. त्या त्यांच्या संस्कृतीनुसार त्यांनी मदतीचे जे ट्रक धाराशिव व इतरत्र पाठवले त्यावर आपला व प्रताप सरनाईकांचे मोठे फोटो छापले होते. साहजिकच काही ठिकाणी स्थानिकांनी या गाड्या परत पाठवल्या. याच शिंदे यांनी रायगडमध्ये इर्शाळगडची दुर्घटना झाली तेव्हा तिथल्या आदिवासींना सहा महिन्यांमध्ये घरे बांधून देण्याचे आश्वासन दिले होते. त्याचे काय झाले हे सर्वांना ठाऊक आहे. या आदिवासींना घरे म्हणून तात्पुरते ज्या काही तात्पुरत्या भिंती ठोकून दिल्या त्या त्यांच्यासाठी अत्यंत गैरसोयीच्या आहेत. पण त्यावेळी शिंदे हे गरिबांचा मसिहा असल्याची प्रसिध्दी झाली. यांचे काम झाले. नंतर त्याकडे पाहण्याची यांना गरज नाही. आज मराठवाड्यातही हेच घडते आहे. पुराचे संकट मोठे असल्याने तिकडे दौरे करणे यांना भाग होते. त्यानुसार यांनी तो उपचार पार पाडला. आता हे बाकीच्या गोष्टी करायला मोकळे. शुक्रवारी फडणवीसांनी दिल्लीत जाऊन मोदींची भेट घेतली. मात्र ही भेट आधीच ठरलेली होती असणार. कारण तिचा मुख्य उद्देश राज्यात संरक्षण उद्योगांचे कॉरिडॉर्स उभारण्याबाबतचा होता. अदानी, अंबानी, टाटा अशासारख्या मंडळींचेच हे प्रकल्प असणार हे कोणीही शाळकरी पोर सांगू शकेल. याच्या परवानग्या भराभर मिळाव्यात आणि जमिनी ताब्यात घेण्याचा मार्ग मोकळा करावा असा यामागचा हेतू दिसतो. शिवाय, याच भागातून जाणाऱ्या शक्तीपीठ मार्गासाठीही जोर लावावा असा त्यातला छुपा अजेंडा असावा. वास्तविक या प्रकल्पांची चर्चा पूर्वीपासून चालू आहे. तरीही फडणवीस यांनी पूर वगैरे गोष्टी सोडून खास दिल्लीमध्ये जाऊन तासभर मोदींशी चर्चा करावी याचा अर्थ यामागे काहीतरी विशेष कारण आहे. गडचिरोलीमधील खाणींमध्ये अदानीने मोठी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे मोदी व फडणवीस यांना त्यात मोठा रस असणे हे साहजिक आहे. पूर वगैरे किरकोळ गोष्टी आहेत. ते नेहमी येत जात राहतात. पण अदानी व इतरांचा धंदा भराभर वाढणे हे अधिक महत्वाचे आहे. सरकारने शेतकऱ्यांना सात हजार रुपये हेक्टर इतकी मदत जाहीर करून झाली आहे. ती त्यांच्या पदरात कधी पडेल हे सांगता येत नाही. लाखोंचे नुकसान झाले असताना असल्या तुटपुंज्या मदतीचा उपयोग शून्य आहे. उद्या अगदी कर्जमाफी झाली तरीही बँक खाते कोरे होईल. पण हातात पैसे येणार नाहीत.

विचार

# विमा खरेदी सुलभ, ब्लू इकॉनॉमीवर भर

***विक्षिप्त ट्रम्पमहाशयांच्या खेळ्यांमुळे आर्थिक आघाडीवर लक्षवेधी बातम्यांची रेलचेल आहे. त्यातील पहिली महत्वाची बातमी म्हणजे चाबहार बंदराची सूट रद्द केल्याने भारताची अडचण होणार आहे. देशांतर्गत महत्वाची वृत्ते म्हणजे यापुढे एकाच पोर्टलवर विमा खरेदी करता येणार आहे. दुसरीकडे शासन 'ब्लू इकॉनॉमी'वर विशेष भर देत आहे. आणखी एक खास बातमी म्हणजे महाराष्ट्र राज्य करोडपतींची राजधानी बनले आहे.***



**महेश देशपांडे**

अमेरिकेने इराणच्या चाबहार बंदराला दिलेली विशेष सूट रद्द केली आहे. २९ सप्टेंबर २०२५ पासून या बंदराचे संचालन, फायनान्सिंग वा सर्व्हिंगमध्ये सामील भारतीय वा विदेशी संस्थांना अमेरिकेच्या निर्बंधांचा सामना करावा लागणार आहे. चाबहार बंदराचे व्यवस्थापन भारतीय कंपनी करत होती. अरब समुद्रात पाकिस्तान आणि चीनचे आव्हान असताना आपले व्यावहारिक हीत साधण्यासाठी भारतासाठी रणनिती म्हणून हे बंदर महत्त्वाचे आहे. त्यामुळे भारताला या अमेरिकन प्रतिबंधांचा तोटा होणार आहे. भारताने इराणच्या चाबहार बंदराच्या विकासासाठी सुमारे तीन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. याच्या विकासात 'पोर्टस ग्लोबल लिमिटेड' (आयपीजीएल) ची महत्त्वाची भूमिका आहे. ही कंपनी येथिल शाहिद बेहेश्ती टर्मिनलचे संचलन करते. 'आयपीजीएल'शिवाय पोर्टच्या संचलन आणि निर्मितीमध्ये 'अॅफकॉन्स इन्फ्रा'देखील सामील आहे. भारतासाठी पाकिस्तानला टाळून अफगाणिस्तान आणि मध्य आशियापर्यंत पोहचण्याचा चाबहार बंदर हा धोरणात्मक महत्वाचा मार्ग आहे. याशिवाय यामुळे पाकिस्तानच्या ग्वादर बंदरातील चीनच्या उपस्थितीला शह देणे शक्य आहे. चाबहार बंदर अफगाणिस्तान आणि मध्य आशियाशी भारताच्या कनेक्टीव्हिटीचे केंद्र राहिला आहे. या बंदराचे काम करणाऱ्या कंपन्यांची सूट समाप्त झाल्याने या योजनेतील वित्तीय आणि कायदेशीर जोखीम वाढू शकते. त्यामुळे भारताच्या रणनीतीला आव्हान निर्माण होऊ शकते. अमेरिकेच्या निर्बंधांबाबत परराष्ट्र मंत्रालयामार्फत अद्याप अधिकृत वक्तव्य आलेले नाही; परंतु परराष्ट्र मंत्रालयाने आधीच स्पष्ट केले आहे, की हे बंदर पाकिस्तानला टाळून अफगाणिस्तान आणि मध्य आशियापर्यंत भारताची कनेक्टिव्हिटी वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने या संदर्भात जारी केलेल्या निवेदनानुसार इराणच्या अतिरेकी कारवाया आणि जग अस्थिर करणाऱ्या कारवाईंना अर्थपुरवठा करणारे अवैध फंडींग रोखण्यासाठी अमेरिका प्रतिबद्ध आहे. इराण या अवैध महसुलाचा वापर अमेरिका आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर हल्ला करण्यासाठी करत असेल, तर आम्ही सर्व उपलब्ध साधनांचा वापर करू, असे अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. अमेरिकन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, सूट जारी करण्याची परिस्थिती आता बदलली आहे. २०१८ मध्ये ही सूट दिली होती, तेव्हा अफगाणिस्तानमध्ये लोकनियुक्त सरकार होते. तेव्हा हे बंदर खाद्य आणि पुनर्निमिती साहित्य आणण्यासाठी महत्वाचा मार्ग मानले जात होते; परंतु २०२१ मध्ये तालिबान सत्तेत आल्यानंतर आणि भारताद्वारे पोर्टचा विस्तार आणि 'इंटरनॅशनल नॉर्थ-साऊथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर'ला जोडण्याच्या घोषणेनंतर अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी सावध केले आहे, की ही योजना इराणला नवा वाणिज्यिक मार्ग देऊ शकते. 'आयएफसीए'अंतर्गत दिलेली सूट हा आदेश म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांच्या फेब्रुवारी २०२५ मधील 'मॅक्सियम इकॉनॉमिक्स प्रेशर' या पॉलिसीचा एक भाग आहे. या अंतर्गत, ट्रम्प विविध मार्गांनी इराणला दिलेल्या सर्व सवलती संपवू इच्छितात.

दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे 'इर्डा' या विमा नियामक संस्थेने देशातील कोट्यवधी विमा ग्राहकांना आनंदवार्ता दिली आहे. 'इर्डा'ने विमा सुगम पोर्टल सुरू करण्याची घोषणा केली आहे. ग्राहकांना आता जीवन, आरोग्य आणि वाहन विमा एकाच पोर्टलवर खरेदी करता येईल. विशेष म्हणजे त्यांना विमा खरेदी करताना अनेक पर्यायांपैकी योग्य वाटणाऱ्या कंपनीचे उत्पादन निवडता येईल. यामुळे अनेक कंपन्यांच्या विविध विमा पॉलिसी एकाच प्लॅटफॉर्मवर दिसतील. त्यातून तुलनात्मकदृष्ट्या चांगली वाटणारी जी पॉलिसी ग्राहकांना निवडता येईल. या प्लॅटफॉर्मवरून ग्राहकांना 'क्लेम सेटलमेंट' आणि विमा पॉलिसीचे नूतनीकरण करता येईल. अशा सरकारी साईटची अनेक दिवसांपासून प्रतीक्षा होती. अखेर एक डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यास 'इर्डा'ने होकार भरला आहे. विशेष म्हणजे या वर्षाअखेरीसच ही साईट आणि याविषयीचे अॅप दाखल होईल. 'जीआयसी' च्या अहवालानुसार, विमा सुगम या नावाने हे पोर्टल आणि अॅप लॉंच होईल. 'विमा सुगम' हे 'वन स्टॉप सोल्यूशन' असेल. याअंतर्गत अनेक विमा कंपन्या एका प्लॅटफॉर्मवर येतील. त्यांची जीवन विमा, आरोग्य विमा आणि वाहन विमा उत्पादने एकाच ठिकाणी उपलब्ध असतील. यापैकी ग्राहकांना कोणताही एक पर्याय निवडता येईल. त्यांना या विम्यामध्ये तुलना करता येईल. पैशांची बचत आणि चांगल्या सुविधा असणारी कंपनी निवडता येईल.आता बातमी ब्लू इकॉनॉमीच्या प्रसाराची. भारताची सर्व पातळ्यांवर प्रगती व्हावी, यासाठी सध्या प्रयत्न सुरु आहेत. आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत होणाऱ्या व्यापारामध्ये वाढ होण्यासाठी तसेच लघु आणि सूक्ष्म उद्योगांची भरभराट व्हावी यासाठी सरकारकडून अनेक महत्त्वाची धोरणे आखण्यात आली आहेत. भारताला विस्तीर्ण असा समुद्रकिनारा लाभला आहे. याच समुद्रकिनारी असणारी लोकवस्ती तसेच समुद्रामुळे निर्माण झालेल्या व्यापारांचा विस्तार व्हावा, यासाठी भारताने धोरण आखले आहे. यामुळे आता या समुद्रकिनाऱ्याच्या मदतीने भारताला प्रगतीच्या नव्या वाटेवर नेण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. भारत विकसित राष्ट्र होण्याचे स्वप्न पाहत आहे. या स्वप्नाचा मार्ग 'ब्लू इकॉनॉमी'तून जातो.

भारताला तब्बल ११ हजार किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. यातील बराच मोठा परिसर हा 'एक्सक्लुझिव्ह इकॉनॉमिक झोन' आहे. त्यामुळे आपल्याला या क्षेत्रात विकास करण्याची खूप संधी आहे. तज्ज्ञांच्या मते मत्स्यपालन, बंदरे, माल वाहतूक, मरिन बायोटेक्नॉलॉजीक, अपारंपरिक ऊर्जा, खोल समुद्रातील शोध इत्यादी क्षेत्रांच्या मदतीने भारत समृद्धीच्या आणि आत्मनिर्भरतेच्या नव्या शिखरावर पोहोचेल. समुद्रकिनाऱ्यावरील अर्थकारण वाढावे यासाठी सरकारने काम चालू केले आहे. सरकारच्या सागरमाला प्रकल्पाअंतर्गत बंदरांचे आधुनिकिकीरण केले जात आहे. पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेच्या माध्यमातून मत्स्य पालन केंद्रात क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हरित सागर मोहिमेअंतर्गत सरकार बंदरांमुळे प्रदूषण होऊ नये, याकडे विशेष लक्ष देत आहे.

आता एक खास बातमी. महाराष्ट्राने देशातील आघाडीचे संपत्ती निर्मिती केंद्र म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. एक लाख ७८ हजार सहाशे करोडपती कुटुंबांसह राज्य संपत्तीमध्ये आजघडीला महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. एकट्या मुंबईमध्ये एक लाख ४२ हजार करोडपती कुटुंबे आहेत. त्यामुळे ती भारताची करोडपतींची राजधानी बनली आहे 'मर्सिडीज-बेंझ हुरुन इंडिया वेल्थ रिपोर्ट'नुसार २०२१ पासून राज्याच्या संपत्तीत १९४ टक्के वाढ झाली आहे. २०२०-२१ पासून ५५ टक्के सकल राज्य देशांतर्गत उत्पादन (जीएसडीपी) वाढीमुळे राज्याच्या समृद्धीला आणखी बळकटी मिळाली. संपूर्ण भारतात आता एकूण आठ लाख ७१ हजार ७०० करोडपती कुटुंबे आहेत. त्यांची संपत्ती ८.५ कोटी किंवा त्याहून अधिक आहे. मुंबईत एक लाख ४२ हजार करोडपती कुटुंबे आहेत, त्यानंतर दिल्ली ६८,२०० आणि बेंगळुरू ३१,६०० ही शहरे आहेत. ही तीन महानगरे भारतातील संपत्तीनिर्मितीची सर्वात मोठी केंद्र आहेत. 'हुरुन इंडिया'चे संस्थापक आणि मुख्य संशोधक अनस रहमान जुनैद म्हणतात की एका दशकापेक्षा कमी कालावधीत एक दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त संपत्ती असलेल्या भारतीय कुटुंबांची संख्या ४४५ टक्क्यांनी वाढली आहे. संपत्ती निर्मिती आपल्या समाजाच्या एका विस्तृत वर्गापर्यंत कशी पोहोचत आहे, हे यातून दिसते. त्यांनी याला 'समृद्धीचे लोकशाहीकरण' म्हटले. म्हणजेच आता अधिक लोकांना संधी उपलब्ध आहेत. तथापि, त्यांनी असेही नमूद केले की २०१७ मध्ये फक्त पाच टक्के करोडपती अतिश्रीमंत बनले आणि फक्त ०.०१ टक्क्यांना अब्जाधीशांचा दर्जा प्राप्त झाला. याचा अर्थ असा की संपत्ती पसरत आहे; परंतु ती अजूनही काही विशिष्ट प्रदेशांपुरती मर्यादित आहे.

चर्चा आजची

# ऐन दिवाळीत लालपरी संपावर?

**वैष्णवी वाडकर**

महाराष्ट्रातील एसटी महामंडळ ग्रामीण व शहरी भागांना जोडणारी महत्त्वाची वाहतूक व्यवस्था आहे. लाखो प्रवासी दररोज एसटीने प्रवास करतात. शाळा, कॉलेज, नोकरी, व्यवसाय, दवाखाना सर्व छोट्या मोठ्या कामांना बाहेर जाण्यासाठी नागरिक एसटी महामंडळाला पसंती देतात. गणपती, दसरा, शिमगा, दिवाळी कोणताही सण समारंभ असला कि एसटी प्रवाशांनी भरलेली असते. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात एसटीने प्रवास करायचे मूळ कारण म्हणजे तिकिटांचे दर हे सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे असतात. त्यात आता महिला व ज्येष्ठ नागरिकांना तिकिटावर ५०% सुट मिळाली आहे. त्यामुळे हल्ली एसटीमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळते. परंतु, आता ऐन दिवाळीत एसटी महामंडळ कर्मचारी संपावर जाण्याच्या चर्चेला उधाण आले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांची लालपरी संपावर गेली तर आपला प्रवास कसा होणार? असा प्रश्न प्रवासी वर्गाला पडला आहे.

एसटी ही सामान्य माणसांची जीवनवाहिनी आहे. ती रस्त्यावर नसेल तर नागरिकांचे हाल होतील. सध्या राज्यात पावसाने जोर धरला आहे, तरीदेखील कुठेही जायचे असले तरी नागरिक एसटीनेच जाणे सोयीचे समजतात. ग्रामीण भागात एसटी बस हिच प्रमुख प्रवासाचं साधन मानली जाते. विद्यार्थी, कामगारांपासून गृहिणींपर्यंत अनेकांची उपजीविका एसटीवर अवलंबून आहे. परंतु, ऐन सणासुदीला जर एसटी कर्मचारी संपावर गेले तर सर्व सामान्य जनतेसह शाळा, कॉलेज आणि नोकरीला जाणाऱ्या नागरिकांची प्रचंड गैरसोय होईल. सध्या पावसामुळे आजारांच्या प्रमाणात देखील वाढ झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागांतील आजारी रुग्णांना शहरातील दवाखान्यात नेण्यासाठी एसटीच नसेल तर त्यांचे प्रचंड हाल होतील. त्यामुळे एसटीच बंद राहिली तर अशा प्रकारच्या अनेक संकटांना समोरे जात अनेकांचे जीवन विस्कळीत होईल, अशी चिंता प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी एसटी कर्मचाऱ्यांनी ऐन दिवाळीच्या तोंडावर संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. यावेळी प्रलंबित मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन करू, असे सांगण्यात आले आहे. १३ ऑक्टोबरपासून एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर धरणे आंदोलन करू, असे परिवहन मंत्र्यांसह एसटी महामंडळाच्या उपाध्यक्षांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले गेले आहे. हे धरणे आंदोलन पुकारण्यामागची सर्वात महत्वाची मागणी म्हणजे एसटी महामंडळाचे राज्यसरकारमध्ये विलीनीकरण. जेणेकरून त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा व आर्थिक सुरक्षितता मिळेल. त्याचबरोबर शासन कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन लागू करणे, २०१६ पासून थकीत घरभाडे, भत्ते आणि महागाई भत्ता देणे, ७ वा वेतन आयोग लागू करणे, दिवाळी बोनस २० हजार रुपये देणे, आंदोलनादरम्यान मृत्यू पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना ८.५ लाख रुपयांची मदत देणे, रिक्त पदांवर नवीन भरती करणे, खासगी बस घेऊ नयेत, राज्य परिवहन महामंडळाच्या स्वतःच्या बस वापराव्यात, महागाई भत्ता राज्य कर्मचाऱ्यांप्रमाणे देणे, २०१५ पासून जी प्रवास भाडेवाढ झाली आहे त्याची पूर्वलक्षीपणे पूर्तता करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना एक रकमी लाभ देणे, अशा एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत. जर या मागण्यांसाठी सरकारने येत्या काही दिवसांत मागण्या पुर्ण नाही केल्या तर राज्यातील सर्व एसटी कर्मचारी आंदोलनात सामील होतील. त्यामुळे दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात एसटी प्रवासी पुन्हा एकदा संकटात सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सणासुदीच्या काळात विशेषतः गणेशोत्सव, दिवाळीत मोठ्याप्रमाणात शहराकडून नागरीक गावाकडे येत असतात. काही वर्षांपूर्वी देखील दिवाळीच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. त्यावेळी एसटी कर्मचारी ऐन दिवाळीत संपावर गेल्यामुळे लाखो प्रवाशांचे हाल झाले. त्यामुळे अनेक सर्वसामान्य जनतेला खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागले होते. मात्र, खासगी वाहनांचे भाडे सगळ्यांना परवडण्यासारखे नव्हते. हा संप जवळ जवळ महिनाभर चालला होता. त्यामुळे अनेकांनी दिवाळीत गावी जाण्याचे टाळले. त्यामुळे पुन्हा अशीच परिस्थिती उद्भवली तर लाखो प्रवाशांना याचा फटका बसेल, असे एसटी प्रेमींकडून बोलेल जात आहे. एसटी कर्मचारी आपल्या मागण्या पूर्ण होण्यासाठी दरवेळा संप करताता. तेवढ्यापूर्ती शासनाकडून त्यांना मागण्यांच्या पूर्तीची आश्वासने दिली जातात. मात्र, प्रत्यक्ष मागण्यांची अंमलबजवणी करण्यात सरकार मागे पडत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने तात्काळ तोडगा काढणे आवश्यक आहे. असे न झाल्यास एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या पुर्ण होतील अथवा नाही होणार. किंवा सरकारकडू एखादे आश्वासन मिळाल्यास तूर्तास तरी आंदोलनाला स्थगीती देतील. परंतु, यात सर्वसामान्य प्रवासी भरडला जाणार आहे. या काळात खासगी वाहनचालक अव्वाच्या सव्वा प्रवासी भाडे आकारतात, त्यामुळे सर्व सामान्य प्रवासी वर्गाला आर्थिक आणि मानसिक दोन्ही संकटांना सामोरे जावे लागते. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तात्काळ तोडगा निघावा, अशाप्रकारे सर्वसामान्य जनता सरकार समोर गाऱ्हाणे मांडताना दिसत आहे.

दिनविशेष

# जागतिक हृदय दिन

जागतिक हृदय दिन हा दरवर्षी २९ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात येतो. हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि या आजारांचा जागतिक प्रभाव कमी करण्यासाठीच्या धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी तो साजरा केला जातो. हृदयाच्या आरोग्याबाबत लोकांना जागरूक करणे हा जागतिक हृदय दिनाचा मुख्य उद्देश आहे.

१९९८ मध्ये, इंटरनॅशनल सोसायटी ऑफ कार्डिओलॉजी इंटरनॅशनल कार्डिओलॉजी फेडरेशनमध्ये विलीन झाल्यानंतर वर्ल्ड हार्ट फेडरेशन अस्तित्वात आले. प्रोफेसर अँटोनियो बायस डी लूना हे १९९७ ते १९९९ पर्यंत वर्ल्ड हार्ट फेडरेशनचे अध्यक्ष होते. त्यांनीच जागतिक हृदय दिन साजरा करण्याची कल्पना मांडली, कारण हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग हा एक महत्त्वपूर्ण जागतिक आजार बनला होता. पहिला जागतिक हृदय दिन २४ सप्टेंबर २००० रोजी साजरा करण्यात आला. २०११ पर्यंत सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या रविवारी हा दिन साजरा केला जात होता. परंतु, २०१२ पासून तो २९ सप्टेंबरला साजरा करण्यात येऊ लागला. हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगच्या प्रतिबंधाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याबाबत जागतिक हृदय दिन महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. तसेच तो तंबाखू सेवन, चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि बैठी जीवनशैलीशी संबंधित धोक्यांकडे लक्ष वेधतो, जे हृदयरोग आणि स्ट्रोकमुळे अंदाजे ८० टक्के अकाली मृत्यूंना कारणीभूत ठरतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, वर्ल्ड हार्ट फेडरेशन हृदय-निरोगी जीवनशैलीच्या संकल्पनेला मूलभूत मानवी हक्क म्हणून प्रोत्साहन देते आणि जगभरात तिचा अवलंब करण्याचे समर्थन करते. हृदयाच्या आरोग्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे कारण हृदय हे केवळ एक पंप नाही; ते आपल्या शरीराच्या कार्यांचे मध्यवर्ती केंद्र म्हणून काम करते. ते असे इंजिन आहे जे सर्वकाही सुरळीत चालू ठेवते. हृदयाचे काम आपल्या रक्ताद्वारे सर्व अवयवांना आणि ऊतींना ऑक्सिजन आणि पोषक तत्वे पोहोचवणे आहे. या महत्त्वाच्या पुरवठ्याशिवाय, शरीर चांगल्या प्रकारे कार्य करू शकत नाही. अलिकडील ट्रेंड्सवरून विविध वयोगटातील लोकसंख्येमध्ये हृदयविकाराचा झटका आणि संबंधित आजारांमध्ये चिंताजनक वाढ दिसून आली आहे. हृदयाची काळजी घेण्याला प्राधान्य देणे हे एखाद्याच्या आरोग्य उद्दिष्टांच्या अग्रभागी असले पाहिजे. ते केवळ एखाद्याचे आयुष्य वाढवण्याबद्दल नाही तर ते दैनंदिन जीवनाची गुणवत्ता सुधारण्याबद्दल देखील आहे. हृदयाची काळजी घेण्यासाठी पावले उचलल्याने, व्यक्ती केवळ त्याच्या आयुष्यात अधिक वर्षे जोडत नाही तर प्रत्येक दिवस अधिक समाधानकारक बनवते.

लोकसंसद

# गर्दीचे व्यवस्थापन करण्यात अपयशी

दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेते आणि नव्यानेच राजकारणात प्रवेश केलेले तमिळगा वेत्री कळघम या पक्षाचे प्रमुख विजय थलपती यांनी आयोजित केलेल्या सभेत चेंगराचेंगरी होऊन ३९ जण मृत्युमुखी पडले आणि १२ जण गंभीर जखमी झाले. शनिवारी रात्री घडलेल्या या दुर्घटनेचा व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल झाला. ही दुर्घटना जितकी धक्कादायक आहे तितकीच ती चिंताजनक आहे. कारण भररस्त्यात आयोजित केलेल्या या सभेत तब्बल ६० हजारांहून अधिक नागरिक उपस्थित होते. अतिशय छोट्या जागेत इतक्या मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहत असतील तर दुर्घटना घडेल हे शाळकरी मुलेही सांगतील. अभिनेते विजय यांनी पहिल्यांदाच अशी सभा केली असे नाही तर याआधीही त्यांनी काही दिवसांपूर्वी अशी रॅली आयोजित केली होती. त्यातही लाखो नागरिकांची उपस्थिती होती. तेंव्हाच अशी काही दुर्घटना घडली तर काय होईल अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. दुर्दैवाने ती भीती आता खरी ठरली अर्थात ही आपल्या देशात चेंगराचेंगरीची पहिली दुर्घटना नाही. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. सध्या तर अशा दुर्घटनांची मालिकाच सुरू आहे. काही दिवसांपूर्वी बंगळुरूमध्ये झालेली चेंगराचेंगरीची दुर्घटना अजूनही ताजीच आहे. जून महिन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले होते. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळीही अशीच चेंगराचेंगरी झाली त्यात ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले होते. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली होती. आताही तशीच शोककळा देशभर पसरली आहे. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. या सभेला पोलिस आणि प्रशासनाने परवानगी दिली होती का? कोणतीही सभा मोठ्या मैदानावर आयोजित केली जाते मग ही सभा रस्त्यावर का घेण्यात आली ? या सभेसाठी मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहणार याची कल्पना आयोजकांना आली नाही का? ज्या जागेची क्षमता वीस ते तीस हजार आहे तिथे दुप्पट नागरिक कसे जमा झाले? ही सभा आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का? इतकी मोठी सभा आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाशी, पोलिसांशी चर्चा केली होती का? या सभेला अपेक्षेपेक्षा अधिक नागरिक जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का? ही राजकीय पक्षाची सभा होती. स्वतःचे राजकीय शक्तिप्रदर्शन दाखवण्यासाठी नागरिकांचा जीव धोक्यात घालणे कितपत योग्य? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ३९ नागरिकांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण? आयोजक, तमिळनाडू सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही नागरिक? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. भारतीय लोक उत्सवप्रिय तसेच व्यक्तिपूजक आहेत. विशेषतः दक्षिणेत तर व्यक्तिपूजेचे मोठे अवडंबर आहे. यात तरुणांची संख्या अधिक आहे. नेते, अभिनेते यांना दैवत मानून त्यांच्या सभेत सहभागी होण्याची यांना फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ३९ नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२९ सप्टेंबर**

१) श्री. गुरूनाथ सदाशिव वार्डे
अलिबाग, २९-९-१९३८
२) श्री. सुरेश रामचंद्र म्हात्रे
श्रीबाग, अलिबाग, २९-९-१९४७

## सुवर्णकण



देवाजवळ आप
पर भाव नाही
जसा तो तुकाराम
महाराजांना भेटला
एकनाथ महाराजांना
भेटला
रामदास स्वामींना भेटला
तसा तो सर्वांच्या
हृदयात असणारा राम
मला ही भेटेल
अशी आपल्या
जीवाभावाची
खात्री असायला पाहिजे

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# शिवभोजन योजनेचे अनुदान थकले

## • केंद्रचालकांची अवघ्या २१ कोटींवर बोळवण

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**शिवभोजन योजना पुढे चालू ठेवण्यासाठी २०० कोटी रुपये मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली. परंतु, प्रत्यक्षात मात्र २१ कोटी रुपये देऊन शिवभोजन केंद्रचालकांची बोळवण करण्यात आली आहे. शिवभोजन केंद्रचालकांचे मागील आठ महिन्यांपासून अनुदान थकले आहे. २१ कोटी रुपयांत जेमतेम एका महिन्याचा खर्च निघेल. त्यामुळे ही योजना चालवायची कशी, असा प्रश्न राज्यातील हजारो केंद्रचालकांना पडला आहे.**



गोरगरीबांची उपासमार टळावी यासाठी १० रुपयांत शिवभोजन थाळीची योजना सुरू करण्यात आली. राज्यभरात जवळपास १८०० शिवभोजन केंद्रे असून दररोज दोन लाख लोकांच्या पोटाची भूक यामुळे भागत आहे. महायुती सरकारच्या काळात मात्र निधीअभावी या योजनेला घरघर लागली आहे. शिवभोजन केंद्रचालकांच्या इशाऱ्यानंतर २०० कोटी रुपये तातडीने देण्यात येतील, असे सरकारने जाहीर केले. असे असताना अन्न व नागरी पुरवठा विभागाने फक्त २१ कोटी रुपये देऊन थट्टा चालविल्याने केंद्रचालकांकडून संताप व्यक्त होत आहे. या विषयात अर्थमंत्री अजित पवार यांनी लक्ष घालून आवश्यक निधीची तरतूद करावी, अशी मागणी शिवभोजन केंद्र संचालक समितीने निवेदनाद्वारे केली आहे.

### २७० कोटींची गरज

**शिवभोजन थाळी योजनेसाठी २७० कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीची गरज आहे. मात्र सरकारकडून अर्थसंकल्पात केवळ ७० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी केवळ आतापर्यंत ४२ कोटी रुपयांचे वितरण झाले आहे.**

**“ सरकारकडून वेळेवर अनुदान मिळत नसल्याने व्याजाने पैसे घेऊन शिवभोजन केंद्रे चालविली जात आहेत. या परिस्थितीत उदरनिर्वाह कसा चालवायचा हा प्रश्नदेखील राज्यातील हजारो केंद्रचालकांपुढे आहे. चार-पाच महिन्यांचा खर्च भागेल एवढी रक्कम तरी अनुदान म्हणून तातडीने देण्यात यावी.**
**- नलिनी भगत, शिवभोजन केंद्र संचालक समिती अध्यक्षा ”**

### उधारीवर किराणा माल मिळणेही बंद

सरकारकडून वेळेवर अनुदान मिळत नसल्याने राज्यात बऱ्याच ठिकाणी व्याजाने पैसे घेऊन किंवा उधारीवर किराणा माल मिळवून शिवभोजन केंद्रे चालविली जात आहेत. मात्र उधारीचे पैसेही थकल्याने आता उधारीवर किराणा माल मिळणेही बंद झाल्याने शिवभोजन केंद्र चालवायची कशी, असा प्रश्न केंद्रचालकांना पडला आहे.

## नवरात्रौत्सवात वरूण राजाचा अडथळा

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

यावर्षी नवरात्र उत्सवामध्ये पावसाने रोजच हजेरी लावली आहे. त्यामुळे नवरात्रीमध्ये देवदर्शन करण्यासाठी जाणाऱ्या भाविकांचे आणि रात्री दांडिया नृत्यप्रेमींच्या आनंदावर विरजण पडत आहे. गणेशोत्सवपेक्षा नवरात्र उत्सवात पावसाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे अजून दसऱ्यापर्यंत पाऊस असाच पडणार की त्याचा जोर कमी होणार याकडे दांडियाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

सार्वजनिक नवरात्र उत्सव ज्या ठिकाणी आहेत. त्या ठिकाणी मोठी आकर्षक विद्युत रोषणाई आणि खास दांडियाप्रेमींसाठी संगीतमय वातावरण निर्माण केले जाते. रोज दांडियाप्रेमी या नृत्यासाठी जात असतात. मात्र यावर्षी पावसाचे प्रमाण असल्यामुळे त्यांची सुद्धा निराशा झाली आहे. दिनांक २७ सप्टेंबरपासून पावसाचे नक्षत्र बदलले आहे. बदलत्या नक्षत्राचे वाहन म्हैस असे असल्याने पुढे अजून दसऱ्यापर्यंत पाऊस असाच पडणार की त्याचा जोर कमी होणारी याकडे आता दांडिया नृत्यप्रेमी आणि भाविकांचे सुद्धा लक्ष लागलं आहे. या नवरात्र उत्सवामध्ये बऱ्याच ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा होत असतात. या कार्यक्रमावरती सुद्धा त्या पावसामुळे विरजण पडले आहे. मात्र, वरुण राजा कितीही बरसला तरी नवरात्रोत्सव आणि त्याचा भक्तिमय आनंद भाविक घेतात.





## पूरग्रस्त बांधवांना मदतीचा हात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळल्याने त्या ठिकाणी पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे काहींची बिकट परिस्थिती आहे. पनवेलमधून पूरग्रस्त बांधवांना मदतीचा हात दिला जात आहे. यामध्ये ग्रामस्थ मंडळ सुकापुर आणि मित्रपरिवार यांच्यामार्फत धाराशिव विभागात मदतीचा हात देण्यात आला आहे.

सुकापुर येथील संदीप म्हसकर, स्वप्निल भुजंग, अमित म्हात्रे, चैतन्य मनोरे यांच्याकडून तसेच धनंजय पाटील, संदीप तांडेल यांच्याकडून तांदूळ, तूरडाळ, वाटाणा, तेल, साखर इत्यादी साहित्याचे २०० किट तयार करण्यात आले आहेत. तसेच दीडशे साड्या या ठिकाणी पाठवण्यात आले आहेत.

# महिला आरोग्य तपासणी शिबीर

## दिव्यांग बालक प्रमाणपत्र वितरण

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा उपजिल्हा रुग्णालय येथे ‘स्वस्थ नारी सशक्त परिवार’ अभियान अंतर्गत दिव्यांग बालकांची तपासणी दिव्यांग प्रमाणपत्र वितरण, नुतनीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन गोमसाळे यांच्या नियोजनाद्वारे होणार असून सोमवारी (दि.२९) सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत असणार आहे.





या शिबिरामध्ये महिलांची आरोग्य तपासणी तसेच माता व बाल सुरक्षा कार्ड, प्रधानमंत्री मातृ वंदना कार्ड, सिकलसेल कार्ड वितरण तसेच पोषण ट्रैकरमधे लाभार्थी नोंदणी शिवाय नागरिकांच्या सक्रीय सहभागा करिता निक्षय मित्र स्वयंसेवक नोंदणी व अवयवदान नोंदणी केली जाणार आहे. शिबिरामधे लहान मुलांची बालरोगतज्ञकडून सर्वांगीन वैद्यकिय तपासणी करुन औषधोपचार करण्यात येईल.

या शिबिराचा जास्तीत जास्त गरजू महिला व दिव्यांग मुलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा रुग्णालय अलिबाग व उपजिल्हा रुग्णालय रोहा प्रशासनतर्फे करण्यात आले आहे.

## अभिनव ज्ञान मंदिराच्या नूतन वास्तूचे उद्घाटन

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या कनिष्ठमहाविद्यालयाच्याचारमजली नूतन वास्तूचे उदघाट्न करण्यात आले. रमा पुरुषोत्तम ट्रस्टने ही नवीन इमारत बांधण्यासाठी आर्थिक मदत केली होती. आता अभिनव ज्ञान मंदिरच्या सर्व विद्यार्थ्यांना एकाच संकुलात शिक्षण घेण्याची व्यवस्था झाली आहे.



नव्वदाव्या वर्षात पदार्पण केलेल्या अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आमराई येथील जुन्या इमारतीत जावे लागत असे. ही समस्या दूर करण्यासाठी पुणे येथील रमा पुरुषोत्तम ट्रस्टने इमारत उभारण्यासाठी हात पुढे केला व सुमारे सात कोटी रुपयांचा निधी वापरून चार मजली सुसज्ज इमारत साकारण्यात आली. या नवीन वस्तूच्या उदघाट्न रमा पुरुषोत्तम ट्रस्टच्या डॉ. आनंद देशपांडे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. तर फॉउंडेशनच्या अध्यक्षा चित्रा बुझ्रुक यांच्या हस्ते कोनशीलेचे अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी अभियंता अरुण गुरव, प्रशांत जगताप, रामभाऊ वाघमारे, भालचंद्र जोशी, जगदीश सारंगधर, डॉ. स्नेहा उपाध्ये यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, राज्य पुरस्कारप्राप्त डॉ. रंजना देशमुख, अनिल गलगले, या शिक्षकांचाही विषेश सत्कार करण्यात आला.

## फर्निचर उद्योगातील कारागिरांचा सन्मान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

ॲक्शन टेस्सा यांच्या माध्यमातून लाकूड फर्निचर उद्योगातील कारागिरांचा विशेष सन्मान करण्यात आला. इंजिनियअर्ड वूड पॅनल उत्पादनांची सर्वात मोठी उत्पादक आणि या क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲक्शन टेस्सा यांनी सलग दुसऱ्या वर्षी राष्ट्रीय सुतार दिन साजरा केला. या निमित्ताने कंपनीने फर्निचर उद्योगात काम करणाऱ्या कारागिरांना एक वेगळी ओळख देण्यासाठी त्यांचा सन्मान केला.



गेल्या वर्षीच्या कार्यक्रमाच्या यशानंतर, या वर्षी कंपनीने राष्ट्रीय सुतार दिनानिमित्त देशभरातील ५० हून अधिक ठिकाणी मेगा मीट आयोजित केली होती. हजारो कारागिरांनी फर्निचर बनवण्याची त्यांची कला सामायिक केली आणि राष्ट्रीय सुतार दिन साजरा केला. गेल्या वर्षीच्या यशावर आधारित, एमएसएमईच्या सहकार्याने विकसित केलेल्या तीन महिन्यांच्या कौशल्य विकास कार्यक्रम, वुड पॅनेल प्रोसेसिंग टेक्निक (डब्ल्यूपीटी) ने सर्व ३० विद्यार्थ्यांना १००% प्लेसमेंट मिळवून दिली. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लगेचच प्रत्येक विद्यार्थ्याला नोकरीची ऑफर देण्यात आली, जी उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि कार्यक्रमाच्या मजबूत उद्योग प्रासंगिकतेची साक्ष आहे.

## तळवली-परचुरी रस्ता खचला

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

गेले दोन दिवस कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने तालुक्यातील तळवली-परचुरी मार्गावरील आगरवाडीकडे जाणारा रस्ता खचल्याचे दिसून येत आहे. यामुळे येथून अवजड वाहतूक करणे धोक्याचे बनले आहे. दरम्यान हा रस्ता खचल्याने आणि पर्यायी मार्ग नसल्याने पांगारी व परचुरीकडे जाणारी एस.टी. बस सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. यामुळे येथील विद्यार्थी व प्रवासीवर्ग यांची मोठी गैरसोय होत आहे.



दरम्यान या रस्त्याची लवकरात लवकर डागडुजी करावी, अशी मागणी आता प्रवासी वर्गातून केली जात आहे.

# गवारेड्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

कळंबट येथे बिबट्याने बाप-लेकावर झडप घातल्याची घटना ताजी असतानाच गुढे येथे गवारेडा या वन्यप्राण्याच्या हल्ल्यात शेतकरी रविंद्र पांडुरंग आग्रे (५५, गुढे जोगळेवाडी) यांचा मृत्यू झाला आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. त्याच अवस्थेत ते बराच वेळ रस्त्यावर पडून होते. या घटनेची माहिती मिळताच गावातील तरूणांनी घटनास्थळी धावत्यानंतर ताबडतोब जखमी आग्रे यांना उपचारासाठी रामपूर प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व पोलीस यांनीही घटनास्थळाची पाहाणी करून पंचनामा केला. दरम्यान, रविंद्र आग्रे यांचा मृत्यू गवा रेड्याच्या हल्लल्यात झाल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. मात्र वन विभागाने अद्याप तरी तसा खुलासा केलेला नाही. शवविच्छेदनाच्या अहवालानंतर ते स्पष्ट होणार आहे.

### हिंस्त्र वन्य प्राण्यांबाबत उपाययोजना आवश्यक

**रविंद्र आग्रे यांच्याबाबत घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. या भागात सर्रास हिंस्त्र वन्य प्राण्यांचा वावर आहे. आतातर त्यांचे हल्ले नागरिकांच्या जीवावर बेतू लागले असून त्यांच्यापासूनचा धोकादेखील दिवसेंदिवस वाढू लागला आहे. त्यामुळे वन विभागाने तातडीने गंभीर पावले उचलून या हिंस्त्र वन्य प्राण्यांबाबत उपाययोजना करावी. तसेच, रविंद्र आग्रे यांच्या कुटुंबियांना शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी नागरिकांमधून मागणी होत आहे.**

मात्र या घटनेमुळे पंचक्रोशीतील नागरिक भयभीत झाले आहेत.

### स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी | पूरक व्यवसायाला मोठी चालना

# पर्यटनामुळे व्यावसायिकांना आर्थिक बळ

**। पालघर । प्रतिनिधी ।**

**जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने, निसर्गाची देणगी लाभलेल्या पालघर जिल्ह्याचे पर्यटन केवळ आनंददायी प्रवासापुरते मर्यादित नसून ते स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचे इंजिन ठरले आहे. जिल्ह्यातील समुद्रकिनारे, ऐतिहासिक गडकिल्ले आणि आदिवासी संस्कृती पर्यटकांना आकर्षित करत आहे. यामुळे अनेक पूरक व्यवसायांना रोजगाराच्या नव्या संधी आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे. पर्यटन हे स्थानिक संस्कृती आणि जीवनशैलीशी जोडले गेल्याने शाश्वत विकासाचा एक आदर्श नमुना म्हणून पालघर जिल्हा पुढे येत आहे.**



पालघर जिल्ह्याच्या समृद्ध पर्यटनामुळे स्थानिकांसाठी रोजगाराचे मोठे दालन उघडले आहे. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, स्थानिक वाहतूक व्यवस्था तसेच इतर अनेक लहान-मोठ्या व्यावसायिकांना पर्यटकांच्या आगमनामुळे आर्थिक बळ मिळत आहे. जिल्ह्यातील पर्यटन स्थळांवरील खाद्यसंस्कृतीचा लाभ घेत अनेक स्थानिक पदार्थ आणि कृषी उत्पादने पर्यटकांना आकर्षित करत आहेत. यात बोर्डीचे प्रसिद्ध चिकू, बहाडोलीची जांभुळे, आणि ताडगोळे यांसारख्या रानमेव्याचा समावेश आहे. याशिवाय, समुद्रकिनाऱ्यांवरील ताजी मासळी आणि स्थानिक बचत गट महिलांनी तयार केलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, तसेच वारली चित्रकला आधारित उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळत आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सरस महोत्सव, बोर्डी चिकू फेस्टिवल, केळवा महोत्सव यामुळे बचत गटातील महिलांना लाखो रुपयांचे आर्थिक उत्पन्न मिळाले, हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे.

पालघरमधील पर्यटन केवळ स्थळांपुरते मर्यादित नसून, विविध महोत्सवांमुळे त्याला एक वेगळेच आकर्षण लाभले आहे. डहाणू, चिकू आणि कासा यांसारख्या महोत्सवांना मुंबई, ठाणे, नाशिक तसेच गुजरात राज्यातील पर्यटकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. डहाणू महोत्सवातून कोट्यवधींची उलाढाल झाली, तर चिकू फेस्टिवलमुळे या प्रसिद्ध फळाला आणि त्यापासून बनविलेल्या पदार्थांना मोठी बाजारपेठ मिळाली. हे महोत्सव स्थानिक कलाकारांना त्यांचे कौशल्य सादर करण्याची संधी देतात आणि पारंपारिक खाद्यसंस्कृतीचा परिचय करून देतात. यामुळे पर्यटकांना मनोरंजनासोबतच स्थानिक संस्कृती अनुभवता येते आणि स्थानिकांच्या व्यवसायाला मोठी चालना मिळते.

### ऐतिहासिक स्थळांच्या जतनासाठी मदत

**जिल्ह्याच्या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करण्यासाठी आणि पर्यटकांना एकाच दिवसात अनेक स्थळे पाहता यावी, यासाठी हेरिटेज वॉक ही संकल्पना आवश्यक ठरली आहे. यामध्ये भवानगड, तांदुळवाडी, काळदुर्ग, केळवा-माहीम किल्ले यांसारख्या पुरातन वास्तूंना भेटी देता येतील. ही मोहीम जिल्हा प्रशासनाने एसटी महामंडळाच्या सहकार्याने सुरू केल्यास स्थानिकांना गाईड म्हणून रोजगाराची संधी मिळेल आणि एसटीच्या उत्पन्नातही वाढ होईल. यामुळे ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व पर्यटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या जतनासाठीही मदत होईल.**

## निवडक



### मोफत हृदय तपासणी शिबीर

**खांब** : रोहा तालुक्यातील घेरासूरगड-वैजनाथ येथे मोफत हृदय तपासणी शिबीर मोठ्या उत्साहात पार पडले. कंपनी उत्पादनाबोबरच सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून व समाजहिताचे व्यापक दृष्टिकोन ठेवून कार्यरत असणाऱ्या रोहा तालुक्यातील व नागोठणे विभागातील सुकेळी येथील बी.सी.जिंदल कंपनीच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये हृदयरोगतज्ज्ञांकडून रूग्णांची मोफत हृदय तपासणी करून औषधोपचार करण्यास आले. यावेळी जिंदल रुग्णालयाचे व्यवस्थापक सर्वेश पांचोली, डॉ. प्रिया भोईर, जिंदल रुग्णालयातील कर्मचारी दिनेश ठमके, किरण सुटे, शरन्या श्रीजीत, मोहिनी जांभेकर, अदिती जंगम, प्रफुल्ल चौधरी, मनिष डांगी, संदिप चालके, यशवंत वारगुडे आदी उपस्थित होते. घेराजनाथ येथील ग्रामस्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे.





### स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**म्हसळा** : म्हसळा शहरात ‘स्वच्छता ही सेवा अभियान’ हा उपक्रम राबविला जात आहे. यातून नागरिकांना स्वच्छतेसाठी एकत्र आणून स्वच्छता हीच सेवा या संकल्पनेला प्रोत्साहन देण्यात आले. या अभियानाचा उद्देश नागरिकांचा सहभाग वाढवून, शहर स्वच्छ आणि निरोगी ठेवणे हा आहे. हे अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत म्हसळा नगरपंचायतीमार्फत राबविण्यात येत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींसह सर्व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे मुख्याधिकारी विठ्ठलराव राठोड यानी सांगितले. यामध्ये एस.टी स्टँड, बस स्थानक अशा सार्वजनिक ठिकाणांची तसेच परिसराची साफसफाई करण्यात आली. यामध्ये लोकप्रतिनिधी आणि स्थानिक नागरिकांचा सहभाग आणि श्रमदानावर विशेष भर देण्यात आला. हा उपक्रम म्हसळा नगरपंचायत मुख्याधिकारी विठ्ठलराव राठोड, पाणीपुरवठा आणि स्वच्छता आभियंता विशाल मोरे यांच्या मार्गदर्शनातून पार पडत आसल्याचे स्वच्छता विभागाच्या शहर समन्वयक सुषमा सोनवणे यानी सांगितले. यावेळी या अभियानांतर्गत स्वच्छता दूतांच्या (कर्मचाऱ्यांच्या) आरोग्य तपासणीचे आयोजन ग्रामिण रुग्णालय म्हसळाने केले. यामध्ये टीटीचे लसीकरणही करण्यात आले.

### फातीमा हाफीज यांचा सन्मान

**कोलाड** : रोहा येथील जेष्ठ नागरिक सभागृहात रोह्यातील प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण नुकतीच पार पडली. या सभेत शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल नागोठणे मीरानगर येथील शाळेत कार्यरत असणाऱ्या मुख्यध्यापिका फातीमा शौकत हाफीज यांना आदर्श मुख्यध्यापिका म्हणून सन्मानित करण्यात आले. यावेळी पतपेढीचे चेअरमन प्रदीप कुमार खाडे, व्हा.चेअरमन अमिता बामणे, चिटणीस प्रशांत चोरगे, सहचिटणीस सुनिल चोगले, मा. चेअरमन संतोष यादव, अजय कापसे, संचालक किशोर जाधव, शशिकांत शेळके, नारायण गायकर, सचिन मुसळे, ईश्वर लाडे, ब्रिजेश भादेकर, समिक्षा जुवेकर, तसेच माजी पदाधिकारी, जेष्ठ शिक्षक सुरेश मोरे, विठ्ठल येलकर तसेच असंख्य शिक्षक वर्ग उपस्थित होते. आदर्श मुख्यध्यापिका फातीमा शौकत हाफीज यांना सन्मानित केल्याबद्दल त्यांचे विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच याअगोदर त्यांच्या विविध स्तरावरून सत्कार करण्यात आला आहे. याशिवाय फातीमा शौकत हाफीज यांना कोल्हापूर येथील अविस्कार फाउंडेशन यांच्यामार्फत पोलादपूर येथे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.





### महाविद्यालयात आरोग्य तपासणी

**आगरदांडा** : कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित मुरूड वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय बॅरिस्टर ए.आर. अंतुले संकुलमधील राष्ट्रीय सेवा योजना १० युनिटच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो विद्यार्थीनींनी व मान्यवरांनी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी करुन आरोग्य शिबीराचा लाभ घेतला. यावेळी प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे, एन.एस.एस.प्रमुख डॉ. श्रीशैल बहिरगुडे, एन एस.एस.प्रमुख डॉ. गजानन मुनेश्वर, प्राध्यापक सिध्देश सतविडकर, आयसीटीसी लॅब टेक्निशियन समीर धांडोरे, पूजा तोंडलेल, लॅब टेक्निशियन वैशाली पाटील, प्रा. प्रवेश पाटील, प्रा. प्रणव बागवे, प्रा. चिंतन पोतदार, रुफी आसावरे, मुस्कान रजब, ग्रामीण रुगणालय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी तीन महिन्यांनी तरी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी करुन घ्यावी. यामुळे अशक्तपणा आणि इतर संभाव्य आरोग्य समस्या लवकर ओळखता येतात. कारण रक्तामधील हिमोग्लोबिन हा शरीरासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

### डॉ. अनिल जोशी यांचे निधन

**गुहागर** : रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे संचालक, खरेदी-विक्री संघाचे संचालक, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष, गुहागर मेडिकल असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अनिल जोशी यांचे शनिवारी (दि.२७) रात्री निधन झाले. तालुक्यातील नरवण येथील डॉ. जोशी हे विविध संघटनांच्या माध्यमातून नेहमीच अग्रेसर होते. त्यांच्यावर रविवारी सायंकाळी ४ वाजता नरवण येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने तालुक्यावर शोककळा पसरली आहे.



# चौलची शितळादेवी



चौलची शितळादेवी नवसाला पावणारी भक्तांच्या जीवनातील श्रद्धेचा जीवंत आधार नवरात्रोत्सवात महाराष्ट्रभरातून येणाऱ्या भक्तांची प्रचंड गर्दी असते. अलिबाग तालुक्यातील ऐतिहासिक चौल परिसर, ज्याला पौराणिक काळी चंपावती आणि रेवती या नावांनी ओळखले जायचे, हा खरोखरच धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाने समृद्ध मानला जातो. या परिसरात एकेकाळी तब्बल ३६० मंदिरे अस्तित्वात होती. त्यापैकी आजही तेजाने झळकणारे आणि भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र असलेले 'शितळादेवीचे मंदिर' हे आदिशक्तीचे स्थान म्हणून प्रसिद्ध आहे. हिरव्यागार नारळी पोफळीच्या सान्निध्यात वसलेले हे मंदिर एकेकाळी खाडीकिनारी वसले होते. आता भराव झाल्याने खाडीचा किनारा दूर सरकला असला तरी, या मंदिराचा दिव्यपणा आणि ऐतिहासिक ओळख अजूनही तितकाच उजळून दिसतो. कथा आणि आख्यायिका अशी सांगते या मंदिराभोवती अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. शितळादेवीने समुद्रालाच शरण आणले, अशी गाथा आजही गावोगावी सांगितली जाते. नवरात्रौत्सवात अष्टागरातील महिला देवीची ओटी वेणी, नारळ व चोळीच्या खणाने भरतात. शितळादेवी नवसाला पावते, मनोकामना पूर्ण करते, अशी भक्तगणांची ठाम श्रद्धा आहे. इतिहासाची साक्ष देणारे मंदिर या मंदिराचा पहिला जीर्णोद्धार इ. स. १५८ मध्ये बाबुभट उपाध्ये यांनी केला होता. १७५७ मध्ये विसावा सरसुभेदारांनी ब्राह्मणभोजन घालून आपली भक्ती दर्शवली.१७८५ मध्ये राघोजी आंग्रे कुटुंबासह देवीच्या दर्शनास आले होते. १७९२ मध्ये त्यांनी मुलाबद्दलच्या नवसासाठी देवीसमोर हजेरी लावली. त्या काळी हत्ती, घोडे आणि लष्करासह त्यांचा तळ या ठिकाणी बराच काळ होता. आंग्रे कुटुंबाची दसऱ्याच्या दिवशी दर्शनाची परंपरा आजही अखंड सुरू आहे.जीर्णोद्धार आणि भव्य नवे मंदिर पूर्वीचे आंग्रेकालीन लाकडी कौलारु मंदिर पाडून, त्याच ठिकाणी आणि त्याच वास्तूत मूर्तीची जागा न बदलता भव्य सिमेंट-काँक्रीटचे मंदिर उभारण्यात आले. २७ मार्च १९९० रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर जीर्णोद्धार समितीने मंदिर बांधणीची सुरुवात केली. सात वर्षांच्या अथक परिश्रमानंतर मार्च १९९७ मध्ये हे काम पूर्ण झाले आणि मंदिर भक्तांसाठी खुले करण्यात आले. आजही नवरात्रोत्सवात तसेच वर्षभर देवीच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी उसळते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणारे भक्त शितळादेवीचे दर्शन घेतात आणि मनोकामना व्यक्त करतात. चौलचे शितळादेवी मंदिर हे केवळ एक देवस्थान नाही, तर श्रद्धा, परंपरा आणि इतिहासाचा जिवंत ठेवा आहे. भक्तांच्या मनाचा जीव आधारलेला हा नवरात्रातील सोहळा रायगडच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाला दिशा देणारा ठरतो.

# ख्रिश्चन मिशनरीकडून बळजबरीने प्रचार

## हिंदू धर्मियांकडून पोलिसात तक्रार

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ परिसरात गेल्या काही दिवसार ख्रिश्चन मिशनरी यांच्याकडून विविध मार्गांनी धर्मांतर करण्याच्या हालचाली वाढल्या आहेत. शनिवारी सकाळी धामोते परिसरात आठ तरुण तरुणी स्थानिकांच्या घरी जाऊन येशू बद्दल माहिती देऊन हेच तुम्हाला संकटातून बाहेर काढू शकतात आहे सांगितले जात होते. त्याबाबत स्थानिक हिंदु लोकांनी जागरूकता दाखवत ख्रिश्चन मिशनरी यांचा प्रचार उधळून लावला. दरम्यान या बाबत नेरळ पोलिसांनी सार्वजनिक कायदा सुव्यवस्था बिघडू नये यासाठी त्या सर्वांवर कारवाई केली असून हिंदू समाज नेत्यांनी यावेळी असे पुन्हा घडू नये यासाठी जागरूकता दाखवण्याचे आवाहन केले.

महिन्यात कोल्हारे आदिवासीवाडीमध्ये धामोते भागात राहणाऱ्या ख्रिश्चन व्यक्तीकडून बळजबरी धर्मांतर केले जात असताना स्थानिक तरुणांनी ही बाब ग्रामस्थांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर त्या ठिकाणी पोहचलेल्या ख्रिचन मिशनऱ्यांना हाकलून लावले होते. ही घटना ताजी असताना आज शनिवारी सकाळी नऊ वाजता अंबरनाथ येथील आठ तरुण तरुणींनी नेरळ साई मंदिर परिसरात येशू ख्रिस्त यांच्याबद्दल माहिती देण्यास आणि ख्रिचन धर्म किती चांगला आहे, त्या वाटेने गेल्यास किती मदत होऊ शकते अशा अनेक प्रकारची माहिती देऊन प्रलोभने दाखवली जात होती. आठ जणांची तुकडी वेगवेगळे गट करून माहिती देण्याचे आणि प्रसार प्रचार करण्याचे काम करीत होती.



### प्रलोभनाना बळी

अंबरनाथ येथील आठ तरुण तरुणींनी नेरळ साई मंदिर परिसरात येशू ख्रिस्त यांच्याबद्दल माहिती देण्यास आणि ख्रिचन धर्म किती चांगला आहे, त्या वाटेने गेल्यास किती मदत होऊ शकते अशा अनेक प्रकारची माहिती देऊन प्रलोभने दाखवली जात होती. आठ जणांची तुकडी वेगवेगळे गट करून माहिती देण्याचे आणि प्रसार प्रचार करण्याचे काम करीत होती.

### ■ ख्रिचन धर्माकडे आकर्षित करणारी वेब साईट

त्यावेळी काही सुशिक्षित असलेले हिंदू तरुणांना त्या ख्रिश्चन मिशनरी यांचा हेतू लक्षात आला. ख्रिचन मिशनरी यांच्याकडून दाखवण्यात येत असलेली जे डॉट ओआरजी ही वेब साईट तरुणांनी सर्च केली असता हा सरळ सरळ हिंदू धर्मियांना ख्रिचन धर्माकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न असल्याचे लक्षात आले. त्यानंतर साई मंदिर नाका येथे असंख्य तरुण जमले आणि त्यांनी त्या ख्रिचन धर्म प्रचारक यांना एकत्र येत तुम्ही काय करता? असे विचारल्यावर आणि त्यांची आधारकार्ड तपासल्यावर हे ख्रिचन प्रसारक असल्याचे लक्षात आले.

त्यावेळी पोलिसांनी या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर नेरळ पोलीस साई मंदिर येथे पोहचले. त्यांनी जमाव संतप्त होण्याआधी सर्व आठ तरुण तरुणींना नेरळ पोलीस ठाणे येथे आणले. यावेळी नेरळ पोलीस ठाण्यात सर्व पक्षाचे कार्यकर्ते तसेच हिंदू धर्मीय संघटना तेथे हजर होत्या. प्रभारी पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी वरिष्ठ अधिकारी पोलीस उप अधिक्षक राहुल गायकवाड यांच्यासोबत चर्चा करून सार्वजनिक शांतता बिघडवण्याचे कार्य करीत असलेल्या ख्रिचन धर्म प्रसारक यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला.ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी नेरळ परिसर फिरत असलेल्या त्या आठ जणांमध्ये तीन महिला आणि पाच पुरुष होते. त्या सर्वांनी मागील खाई वर्षात ख्रिश्चन धर्म स्वीकारला असल्याचे आढळून आले आहे. तर त्या पाच तरुणांमध्ये एक तरुण १७ वर्षाचा होता आणि तो देखील धर्म प्रसारक म्हणून घरोघरी फिरत होता. या प्रकाराने नेरळ गावातील अनेक हिंदू तरुण नेरळ पोलीस ठाणे येथे जमले होते. मात्र पोलिसांनी कारवाई करण्यास सुरुवात केल्यानंतर सर्वांनी त्या लोकांना पुन्हा नेरळ भागात येण्यास प्रतिबंध करावा अशी मागणी पोलिसांकडे केली आहे.



# सोमण यांच्या तत्परतेने अपघातग्रस्तांचे वाचवले प्राण

। पनवेल । प्रतिनिधी ।

चंद्रशेखर सोमण यांच्या तत्परतेने दोन रस्त्यामधील असलेला फरक व त्यामुळे सातत्याने होणारे अपघात याबाबतची माहिती पनवेल वाहतूक शाखेला देताच तेथील वपोनि औदुंबर पाटील यांनी तातडीने सदर रस्त्यावर असलेला फरक माती टाकून सरळ केला त्यामुळे या भागात होणारे अपघात टाळण्यास मदत झाली आहे.

विद्युत वीज वितरण कंपनीचे डिव्हीजनल अकाऊंट सांडभोर व आऊटलेट कर्मचारी करण पाटील हे वसुली मोहिमेंतर्गत आपल्या दुचाकीवरुन पनवेल बाजूकडून ओरियन मॉलजवळील उड्डाण पुलावरुन नवीन पनवेल बाजूकडे जात असताना उड्डाण पुलाच्या उतरणीच्या वेळी दोन रस्त्यामध्ये फरक असल्याने त्यांचे वाहन घसरुन झालेल्या अपघातात हे दोघेजण जखमी झाले होते. याबाबतची माहिती अतिरिक्त कार्यकारी अभियंता धनंजय सातपुते यांना समजताच त्यांनी तातडीने इतर शासकीय अधिकार्यांना याची माहिती देवून हे अपघात टाळण्यासाठी मागणी केली. या संदर्भात सोमण यांना समजताच त्यांनी त्वरित पनवेल वाहतूक शाखेचे वपोनि पाटील यांच्याशी संपर्क साधून सदर दोन्ही रस्त्याची समांतर लेव्हल करण्याची मागणी केली. या ठिकाणी अशाच प्रकारे सातत्याने अपघात होवून अनेक जण जखमी होत होतात. याची माहिती दिली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पाटील व त्यांच्या पथक पोहचून इतर मदत कार्याच्या सहाय्याने त्या दोन रस्त्यामधील तफावत दूर केली व त्यांना समांतर रस्ता केल्याने येथे होणारे नियमित अपघात आता या पुढे टळणार आहेत. याबद्दल विद्युत वीज वितरण कंपनीने सोमण यांच्यासह पनवेल वाहतूक शाखेचे आभार मानले आहेत.

# कोमसापाचे कवीसंमेलन साजरे



। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील कळंबुसरे येथील आदर्श नवरात्र उत्सव मंडळातर्फे बुधवारी (दि.२४) रोजी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कवी संमेलनात आगरी भाषेतील वास्तववादी कवितांचे सादरीकरण करून समाज प्रबोधन करता मोठी रंगत आणली. रंजना केणी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एल बी पाटील यांना कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त पद प्राप्त झाल्याबद्दल आदर्श मंडळाकडून त्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी मच्छिंद्र म्हात्रे, संजीव पाटील, अनंत पाटील, अजय शिवकर, नरेश पाटील, दौलत पाटील, नरेंद्र दाभोलकर, संजय ठाकूर, प्रियांका गवई, संजय केणी तसेच अन्य कवींनी आपल्या कविता सादर केल्या. यावेळी उपस्थित कवींचा अध्यक्ष चेतन पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला

# प्रशासकीय कारभारावर ग्रामस्थांची नाराजी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात ३१ ग्रामपंचायतीवर सदस्य मंडळाची मुदत संपल्याने प्रशासक बसले आहेत. त्यातील कशेळे ग्रामपंचायतने आपल्या वार्षिक निविदेत पाण्याची दोन हजार लिटर क्षमतेची टाकी चक्क ३६ हजार रुपयांना खरेदी केली आहे. याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीमधील प्रशासक राजवटी बद्दल नाराजी व्यक्त केली असून कर्जत पंचायत समिती गटविकास अधिकारी यांनी चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

ग्रामपंचायतीकडून वार्षिक निविदा काढली असून त्यात धूळ फवारणी मशीन, कीटकनाशके, दिवाबत्ती, मेडिकलोर आणि जेवणाचे टेबलांची खरेदी करण्यासाठी निविदा काढली.

### ■ पाण्याच्या टाकीसाठी मोजले तब्बल ३६ हजार
### ■ गटविकास अधिकाऱ्यांनी चौकशी करण्याच्या मागणीला जोर

ही निविदा प्रक्रिया पाहिल्यावर कशेळे ग्रामस्थ चक्रावले असून पेपर स्टॉलवर न मिळणाऱ्या कोणत्यातरी वृत्तपत्रात ही जाहिरात छापण्यात आली आहे. त्यातील दोन हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी साठी चक्क ३६ हजार रुपये एवढे खर्च करण्यात आले आहे. त्यातही पाण्याची टाकी पुरवठा करण्याची निविदा तालुक्यातील कोणत्याही ठेकेदाराला मिळाली नसून मुरबाड तालुक्यातील ठेकेदारांना मिळाली आहे. तालुक्यातील कोणत्याही दुकानात हीच पाण्याची टाकी अर्ध्याहून कमी किमतीत उपलब्ध आहे, असे असताना एवढी मोठी रक्कम खर्ची टाकण्यात आल्याने नाराजी व्यक्त केली आहे.

> आम्ही निविदा प्रक्रिया करूनच प्राप्त झालेल्या निविदेला मान्यता दिली आहे.त्यात कोणतेही गैरकृत्य केलेले नाही.
> – उज्वला भोसले, प्रशासक

याबाबत उदय पाटील यांनी आवाज उठवला. ग्रामपंचायतीच्या नावाने विविध साहित्य खरेदी करण्यात आले असून याबाबत ७ एप्रिल २०२५ या तारखेला वृत्तपत्रात जाहिरात काढण्यात आली आहे. या जाहिरातीत खरेदी केलेल्या सामानाची रक्कम पाहिल्यावर येथील प्रशासनाने लूट केल्याचे निदर्शनास आले असून ती जाहिरात सध्या सोशल मीडियावर चांगलीच गाजत आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने एका खासगी वृत्तपत्रात जाहिरात छापून आणली आहे. परंतु कर्जतमधील दररोज प्रकाशित होणारी वृत्तपत्रे डावलून कधीच प्रकाशित न होणाऱ्या एका अल्पपरिचित पेपरमध्ये ही निविदा देण्यात आली. या सर्व प्रकारामागे भ्रष्टाचार दडलेला असून याची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

# सिद्धेश्वर शाळेत भोंडला साजरा



। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

सिद्धेश्वर शाळेत आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत भोंडला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी जागृती भोनकर, पल्लवी कोनकर, स्वप्नाली काळे, प्रिया काळे यांनी मेहनत घेतली, तर सावंत काकी, यामिनी शिर्के यांनीही पारंपारिक भोंडला गीतांवर नृत्याचा आनंद घेतला. या उपक्रमाचे गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, कैलास म्हात्रे, रविंद्र यादव, तेजस्विनी गायकवाड व सर्व सदस्य, मुख्याध्यापिका रोहिणी खामकर यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे जनार्दन भिलारे यांनी यशस्वी आयोजन केले होते.

# नाग्या महादू कातकरी यांची जयंती साजरी

। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

आंबिवली आदिवासीवाडी येथे वीर हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांची ९५ वी जयंती आदिवासी बंधू भगिनींच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. याप्रसंगी हरिचंद्र महाडिक, मनोहर साळवी, हरिभाऊ ठाकरे, शशिकांत जगताप, चंद्रकांत जगताप, गणेश मांडवकर, गणपत वाघमारे, तुळशीराम जाधव, शांताराम वाघमारे, वासंती जगताप,



भागी जाधव, एकदा जाधव, सुशीला वाघमारे, तसेच बहुसंख्य आदिवासी महिला, तरुण, तरुणी, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



● नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ बोरी, ता. उरण.



● चेंढरे येथील पाटीलवाडीमध्ये आयोजित केलेल्या वेशभूषा स्पर्धेत आकर्षक वेशभूषा करून सहभागी झालेले स्पर्धक.



● संत गोरा कुंभार नवरात्रौत्सव मंडळ म्हसळा.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● अलिबागमधील आर्किटेक्ट ऑफिसकरीता ऑटोकेड ड्राफ्टसमन ३d डेवलपर, इंटीरियर डिझाइनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७

● अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट ,गोंधळपाडा, रेवस बायपास परिसरामध्ये २BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्कंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको मो. ७७५८९७५४०७

● १५०० स्के. फुटाची व्यावसायिक जागा भाड्याने देणे आहे. (दवाखाना, ऑफिस, बँक यांना प्राधान्य) संपर्क : ९२८४५५५३७४, संपर्काची वेळ : दुपारी ४ ते रात्री ९

● विज्ञान विषय शिक्षक पाहिजेत. आपण इयत्ता आठवी नववीचे सायन्स शिकवू शकता का? उत्तर होय असल्यास त्वरीत आपला अर्ज सादर करा. shikshaknokri@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९० / २२२७६१

नवरात्रोत्सव २०२५ रंगशक्ती



● आरडीसीसी बँक, वडखळ.





● पाटील परिवार, परहूरपाडा



● उर्मीला थळे, अलिबाग







● कोकणस्थ परिवार, पुणे.



● पेझारी येथील पाटील परिवारातील सखींनी केला नवरात्रीतील नवरंगांचा उत्सव.



● घाटकोपर येथील नवरात्रोत्सव महिला मंडळाच्या कार्यकर्त्या.



● म्हसळा तालुक्यातील कुडतुडी येथील महिलांचा रंगोत्सव.

# रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

## • सापे वामणे रेल्वे स्थानकावर सुविधांची वानवा

। महाड । प्रतिनिधी ।

**महाड शहरापासून १० किमी अंतरावर असलेल्या वामने गावातील सापे वामणे रेल्वेस्थानकात विविध समस्या उद्भवत आहेत. या स्थानकात दादर-रत्नागिरीसह दिवा-सावंतवाडी या दोनच पॅसेंजर गाड्या थांबत आहेत. त्यामुळे मुंबईकडे जाण्यासाठीची व्यवस्था आहे, परंतु, कोकण रेल्वेच्या ढिसाळ कारभारामुळे निर्माण होणाऱ्या गैरसोयींमुळे प्रवासी वर्गात तीव्र नाराजी आहे.**

कोकण रेल्वेचे सापे-वामणे रेल्वे स्थानक हे पूर्वी होल्ड स्टेशन होते. त्याचे डिसेंबर २०२० पासून स्थानकात रुपांतर झाले. हे स्थानक प्रवाशांसाठी सुविधांनी नटलेली भव्यदिव्य इमारत, तिकिट घर, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि स्वच्छतागृह इत्यादींनी सुसज्ज झाले असले तरीही उच्च स्तरीय फलाटाची सुविधा नसल्यामुळे रेल्वे गाडीतून चढता, उतरताना वारंवार अपघात घडण्याच्या घटना घडत आहेत.



### प्रवाशांसह ग्रामस्थ आक्रमक

सरकार आणि रेल्वे प्रशासनाने वेळीच जागरुक व्हावे व हा जीवघेणा प्रवास सुखकर करावा. सापे वामणे स्थानकाचा तातडीने विकास करा नाहीतर आम्हाला रेल रोको किंवा रस्त्यावर उतरल्या शिवाय पर्याय नाही. तुमच्या उदासीनतेमुळे व हलगर्जीपणामुळे जीवितहानी होऊ शकते. अशा दुर्घटना घडल्यास प्रशासन जबाबदारी घेणार आहे का? अशी आक्रमक भुमिका स्थानिक ग्रामस्थ व प्रवाशांनी समाज माध्यमातून व्यक्त केली आहे.

वारंवार होत असलेल्या उच्च स्तरीय फलाटाच्या मागणीकडे रेल्वे प्रशासन दुर्लक्ष करत आहे. मात्र, आता या गैरसोयीबद्दल नागरिकांचा उद्रेक होण्याची शक्यता आहे. प्रवाशांसाठी सापे वामणे स्थानक हे अत्यंत सोयीचे आणि महत्वाचे स्थानक असून त्या स्थानकाला सोयी सुविधा पुरवण्याची जबाबदारी ही सुद्धा कोकण रेल्वे व रेल्वे प्रशासनाची आहे.

> रेल्वे प्रशासनाकडे स्थानकाच्या देखभालीबाबत वारंवार मागणी केली आहे. फलटाची उंची वाढवा अशा प्रकारची मागणी केलेली असून देखील याकडे दुर्लक्ष केले जात आहे.
>
> – मन्सूर देशमुख, अध्यक्ष, कोकण रेल्वे प्रकल्पग्रस्त कृती समिती

केंद्र सरकार व रेल्वे मंडळाने सापे वामणे स्थानकाला अमृत भारत योजनेत समाविष्ट करावे व या समस्या दूर कराव्यात. या मागणीकडे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून कार्यवाही करावी, अन्यथा फलाटाच्या कमी उंचीमुळे सापे वामणे स्थानकाचा काळा दिवस उजडायला वेळ लागणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

> कोकण रेल्वेकडे पत्रव्यववहार केला आहे. कुणबी युवक मंडळाच्यावतीने स्थानिक नागरिक, प्रवासी संघटना आणि सामाजिक संघटना असे संयुक्तपणे सापे वामणे रेल्वे स्थानक संदर्भात आंदोलन उभारण्याची आम्ही तयारी करीत आहोत. त्यामुळे स्थानकावर आवश्यक सुविधांच्या अभावामुळे जीवघेण्या दुर्घटना टाळण्यासाठी कोकण रेल्वे प्रशासनाने आमच्या मागण्यांकडे लक्ष द्यावे.
>
> – ॲड. विशाल गोलांबडे, युवाध्यक्ष, कुणबी युवक मंडळ महाड, पोलादपूर

# नाचणीच्या पिकाला पावसाचा तडाखा

। चिरनेर । प्रतिनिधी ।

दोन दिवस कोसळत असणाऱ्या हस्त नक्षत्रातील परतीच्या पावसाने चांगलाच जोर पकडला आहे. त्याचा परिणाम खरीप हंगामाला बसू लागल्याने भात, नाचणी, आणि वरी ही पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

उरण तालुक्यात जोरदार स्वरूपात कोसळणाऱ्या परतीच्या पावसामुळे भात, नाचणी व वरीची पिके धोक्यात आली आहेत. या भागात ठाकूर, कातकरी आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणावर नाचणी व वरीची पीके घेत आहेत. बऱ्याच ठिकाणच्या खलाटीत व रानमाळात भात, नाचणी, आणि वरीची पिके फुलोरा धरण्याच्या अवस्थेत आहेत. तर, भात पिके दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत. तसेच, काही भागात भात पिके आठवडाभरात कापणीसाठी तयार झाली आहेत. मात्र, सतत कोसळणाऱ्या पावसामुळे भात शेतीवरील फुलोरा गळून पडत आहे. त्यामुळे भाताचे दाणेही पोचट राहण्याची शक्यता शेतकऱ्यांनी वर्तवली आहे. दरम्यान, परतीच्या पावसाचा दरवर्षी येणारा अनुभव शेतकऱ्यांना असल्याने, शेतमालाचेही मोठे नुकसान होऊ लागल्याने शेतकरी द्विधा मनस्थितीत सापडला आहे. भात पिके आडवी झाल्याने शेतकरी धास्तावला आहे. दरवर्षी परतीच्या पावसाचा तडाखा शेतीला बसत असल्याने शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होत असल्याचे शेतकरी दत्तात्रेय म्हात्रे यांनी सांगितले. परतीच्या पावसाचा असाच धुमाकूळ राहिला, तर तयार भातशेती काही ठिकाणी आडवी तर काही ठिकाणी भुईसपाट होण्याची शक्यता आहे. ऐन पिके हातात यायच्या सुमारास परतीचा पाऊस चांगलाच सक्रिय झाल्याने शेतकरी वर्गाच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

# उरणमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन

। उरण । प्रतिनिधी ।

नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ बोरी उरण यांच्यावतीने यंदाही नवरात्रौत्सवात २२ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे, असे मंडळ कार्यकारिणीकडून सांगण्यात आले आहे. यंदाचे या मंडळाचे ५१वे वर्ष आहे. यादरम्यान घट स्थापना, लहान मुले व पुरुषांचे मनोरंजन कार्यक्रम, हरीपाठ, हळदीकुंकू, खेळ पैठणीचा सन्मान गृहलक्ष्मीचा, आरोग्य शिबीर, शिल्पकला, फाइनआर्ट, वर्कशॉप, पाक कला स्पर्धा, नवदुर्गा पुरस्कार पारितोषिक वितरण समारंभ, होम हवन,



महाप्रसाद, संस्कृतिक कार्यक्रम, पारंपारिक बाल्या नृत्य, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण अभियान, वेशभूषा गरबा, महाजागरण, नवदुर्गा मातेची मिरवणूक आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना मंडळाचे अध्यक्ष अतुल ठाकूर, उपाध्यक्ष विशाल चौलकर, स्वागताध्यक्ष जयवंत सतेरे, कार्यध्यक्ष सुदेश साळुंखे, सचिव दिपेश म्हात्रे, खजिनदार हेमंत अधिकारी, सह सचिव दिलीप साळुंखे, वसंत कुलये, सह खजिनदार कुणाल पवार, रवींद्र म्हात्रे व सर्व कार्यकारिणी सदस्य, सन्मानीय निमंत्रक, प्रमुख सल्लागार, सर्व सभासद, देणगीदार, वर्गणीदार व हितचिंतक आदींचे सहकार्य लाभणार आहे.

# पैठणी स्पर्धेत हजारो महिलांचा सहभाग

। खारेपाट । प्रतिनिधी ।

आवास येथे 'खेळ पैठणीचा' या भव्य स्पर्धेत हजारो महिलांनी सहभाग घेतला होता. हा कार्यक्रम श्री जोगेश्वरी माता सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ आवास तर्फे घेण्यात आला. या स्पर्धेत सुरभी भगत पैठणीच्या मानकरी ठरल्या. त्यांना सिने अभिनेते पुष्कर श्रोत्री आणि मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्रधान करण्यात आले. तसेच, द्वितीय क्रमांक रश्मी ठाकूर यांना नाकातील नथ व तृतीय क्रमांक शालिनी गुंजाळ यांना चांदीचा करंडा भेट देण्यात आला.

# जिल्हा अधिक्षक रंगल्या गरब्यात

। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी नेहमीच जनतेसोबत जवळीक साधत वेगळा आदर्श ठेवला आहे. त्याची आणखी एक झलक पेण शहरात भरविण्यात आलेल्या अंबिका माता नवरात्र उत्सवात पाहायला मिळाली. नवरात्र उत्सवाच्या पारंपरिक रास-गरबा कार्यक्रमाला उपस्थित राहून आँचल दलाल यांनी थेट जनतेसोबत गरब्याच्या रंगात सहभाग घेतला. जिल्हा पोलीस प्रमुखांचे हे साधेपण आणि आपलेपण पाहून उपस्थित नागरिक भारावून गेले. पोलीस व जनतेमधील दरी कमी करून विश्वासाचे नाते दृढ करण्याच्या दिशेने हा आगळावेगळा उपक्रम ठरला. नवरात्राच्या शुभ प्रसंगी त्यांनी नागरिकांना उत्सव शांततेत, श्रद्धा आणि सामंजस्य जपत साजरा करण्याचे आवाहन केले. पोलीस प्रशासन फक्त कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठीच नाही, तर जनतेशी मनापासून जोडलेले आहे हा संदेश आँचल दलाल यांच्या उपस्थितीमुळे अधोरेखित झाला.

# रावे गावात बरसल्या काव्यधारा

। उरण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील रावे येथील काव्य दरबारचे सल्लागार अरुण पाटील यांच्या निवासस्थानी काव्य दरबार संस्थे मार्फत शनिवारी (दि.२७) काव्यधारेचे आयोजन करण्यात आले होते. बाहेर पाऊसधारा बरसत असताना या कवी संमेलनात मात्र काव्यधारांचा वर्षाव सुरू होता. कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान रावे गावचे ज्येष्ठ नागरिक रामदास पाटील यांनी भूषविले होते. तर, इतिहासकार के.एम. मढवी यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. अरुण म्हात्रे यांच्या गणेश स्तवनाने तर भ.पो. म्हात्रे यांच्या



स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रसिद्ध कवयित्री मीनल माळी यांच्या बहारदार सूत्रसंचलनात कवी संमेलनाचा कार्यक्रम रंगला. या कवी संमेलनात हरिश्चंद्र माळी, के.एम. मढवी, मिनल माळी, अरुण म्हात्रे, भ.पो. म्हात्रे, अजय शिवकर, एस.एस. पाटील, रवींद्र मोकल, मनोज पाटील, तुळशीदास पाटील, नरेश म्हात्रे या कवींनी आपल्या उत्स्फूर्त कवितेतून सुंदर रचना सादर केल्या.

# चिरनेरमध्ये रंगला खेळ पैठणीचा

। चिरनेर । प्रतिनिधी ।

चिरनेर येथील अभिनव मित्र मंडळाच्या नवरात्र उत्सवात 'खेळ पैठणीचा सन्मान गृहलक्ष्मीचा' हा कार्यक्रम महिला वर्गात आकर्षणाचा विषय ठरला. पेण येथील प्रसिद्ध होम मिनिस्टर फेम अक्षय पाटील यांनी निवेदनातून आपले विनोदाचे कसब वापरून या कार्यक्रमाला चार चांद लावले. साधारणतः ४० ते ५० महिलांनी या कार्यक्रमामध्ये भाग घेतला होता. या खेळामध्ये प्रथमा म्हात्रे यांनी विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देत, सर्वच खेळात बाजी मारून, पैठणीच्या खेळावरीही आपली छाप उमटविली. तसेच, त्या 'खेळ पैठणीचा सन्मान गृहलक्ष्मीचा' या खेळातील पैठणीच्या



मानकरी ठरल्या. तर, प्रीती फुंडेकर या उपविजेत्या ठरल्या असून स्वाती भगत या तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या आहेत. त्यांना मंडळाच्या महिला सदस्यांच्या हस्ते पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले.

# जांबरुंग शाळेला वॉटर फिल्टर भेट

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील जांबरुंग गावामधील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत भारत पेट्रोलियम यांच्या माध्यमातून सौर ऊर्जेवर चालणारे वॉटर फिल्टर बसवण्यात आले आहे. त्यामुळे पुढील काळात विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी प्यायला मिळणार असल्याने जांबरुंग ग्रामपंचायतीसह पालक वर्ग, विद्यार्थी व ग्रामस्थांनी भारत पेट्रोलियमचे आभार मानले आहेत.

यावेळी सरपंच शिल्पा खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत खांडेकर, ग्रामपंचायत सदस्य सचिन तांडेल, सदस्य मारुती गायकर, कल्पना पाटील, मुख्याध्यापक सोनटक्के व शिवाजी शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.




जिल्हा परिषद शाळा टिकावी, यासाठी शासनासह विविध सामाजिक संस्थांच्यावतीने विविध उपक्रम राबवीत जिल्हा परिषद शाळेचे महत्त्व विद्यार्थ्यांसह पालकांना पटवून देण्यात येत आहे. तर, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे घेत असताना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी काही लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्था पुढे सरसावले आहेत. त्यांच्या माध्यमातून अनेक शाळांमध्ये अमुलाग्र बदल झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यातच खालापुर तालुक्यातील ग्रामीण जांबरुंग गावामधील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी भारत पेट्रोलियमच्या माध्यमातून सौरऊर्जेवर चालणारे वॉटर फिल्टर बसवण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसत होता. तसेच, सौरऊर्जेवर चालणाऱ्या वॉटर फिल्टरमुळे शाळेतील विजेची बचत होणार असून विद्यार्थ्यांना सुरक्षित पाणी पिता येणार आहे.

> सौर ऊर्जेवर चालणारा वॉटर फिल्टर बसवल्याने विद्यार्थी वर्गासह शिक्षकांना शुद्ध व सुरक्षित पाणी मिळणार असून यातून विजेच्या खर्चातही बचत होणार आहे. तसेच, सौर वॉटर फिल्टर हे विजेवर किंवा डिझेलवर चालणाऱ्या वॉटर पंपांच्या तुलनेत अधिक फायदेशीर आणि पर्यावरणपूरक आहे. त्यामुळे भारत पेट्रोलियमचे मनापासून आभार.
>
> – शिल्पा खांडेकर, सरपंच

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत मिळकतींचे मुळ श्री. विजय वक्तावरमल जैन यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले असुन तशी बोलणी देखील केलेली असुन सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र(हे.आर) | पो.ख.(हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| अंतोरे | ४१/१/अ | १-१३-४० | ०-००-०० | २.८२ |

या मिळकतीचे एकुण क्षेत्रापैकी ०-३०-००(हे.आर.) इतक्या क्षेत्राची मिळकत व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जातील, वहीवाटीतील, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहीवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजीत व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. २९/०९/२०२५

**ॲड. पुष्कर धनदास मोकल**
रा. ईशान्य को. ऑप. हौ. सोसायटी,
बी-विंग, पहिला मजला, फ्लॅट नं. १०३,
महाजन हॉस्पिटलचे बाजुला चिंचपाडा,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ८६८७३६९३६९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसींनें कळविण्यात येते की, माझे अशिलांस, **श्री. सुनिल अर्जुन वाघमारे,** रा. बोरिवली, मुंबई यांनी त्यांचे मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णन केलेली मिळकत कायमस्वरुपी विकण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सर्वे,ता.मुरुड, जि.रायगड. | २०५/२ | ०-४६-४० <br> पो.ख. ०-०२-३० <br> एकूण ०-४८-७० | ९.२३ |

पैकी ०-१३-०० हे.आर.ही मिळकत, आकार २.५९ रु. पै.ही मिळकत

वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. तरीही वर नमूद मिळकतीत कोणाचाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, पोटगी, मृत्युपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २९/०९/२०२५

**ॲड. विजय विठोबा पाटील**
F-१०४, पहिला मजला, ॲकॉन्स एन्क्लेव्ह,
डॉ. पुष्पलता शिंदे हॉस्पीटल समोर, चेंढरे अलिबाग

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ: विभागीय अभियंता (विद्युत)
## मुंबई प्रदेश किरोल रोड : विद्याविहार [ पश्चिम ] : मुंबई-400 086

Email. deelectmbi@gmail.com Phone ०२२-२५१३६३०३

क्र.राप/काअमुं/विअ(विद्युत)/ईनिविदा/६८५ दिनांक:२९/०९/२०२५

**ई- निविदा सुचना क्रमांक ०८ सन २०२५-२६ (विद्युत)**

विभागीय अभियंता (विद्युत), रा.प. मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार (प) मुंबई- ८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र राज्य यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई-निविदेकरीता मोहरबंद निविदा मागवित आहेत.

| ई क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु |
|---|---|---|
| १२२२८८५_१ | रा.प. रत्नागिरी विभागातील चिपळुण बसस्थानकात ईव्ही बस चार्जिंग स्टेशनसाठी एचटी पॉवर सप्लाय व्यवस्था प्रदान करणे. | ४४९५६८६९.०० |
| १२२२८८५_२ | रा.प. रायगड विभागातील नुतनीकरण केलेल्या पोलादपुर बसस्थानकाचे विद्युतीकरण करणे. (विद्युत काम व फायर अलार्म सिस्टम) | १५११४५७.०० |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | निविदा डाउनलोड व विक्री व तयार करणे | २९/०९/२०२५ | १०.०० |
| 2 | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | १३/१०/२०२५ | १०.०० |
| 3 | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | १४/१०/२०२५ | १०.०० |
| 4 | देकार पुर्व बैठक | ०६/१०/२०२५ | ११.०० |

टीप:- १. सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील सदर कामांची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**विभागीय अभियंता (विद्युत)**
**रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. रूपेश बंडू दिघे व इतर ३ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-जांभिवली, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमीन मिळकत**

| भूमापन क्र. व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ७१/२ | एकूण क्षेत्र ०-४२-०० हे आर पॉ यापैकी क्षेत्र ०-२१-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ४-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लिज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांनी आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसां लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २९/०९/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळमजला हिरापन्ना शॉपिंग, प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, आमराई रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळमजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, आमराई रोड, कर्जत, ता. कर्जत जि. रायगड ४१०२०१

## जाहिर नोटिस

ॲड. वैभव कानिटकर

**पनवेल येथील मा. सह जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात**
**दिवाणी संकीर्ण अर्ज क्रमांक ८९/२०२५**

श्रीमती संपदा संदिप हजारे
वय ४२, धंदा गृहिणी, — अर्जदार
रा. पाटील आळी, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
विरुद्ध
कोणीही नाही — -सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. संदिप मोतीराम हजारे यांचे निधन दिनांक १५/१०/२०१६ रोजी झाले. कै. संदिप मोतीराम हजारे त्यांचे पश्चात त्यांची अज्ञान मुलगी कु. सेजल संदिप हजारे हिचे पुढील शिक्षण व पालनपोषण व देखभाल करण्याकरीता पालनकर्ता म्हणून नेमणूक होऊन तसे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे पती कै. संदीप मोतीराम हजारे यांचे नावे मौजे मोहिलीतर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथे सर्व्हे व हिस्सा क्र. ११/१/क ची मिळकत आहे. अर्जदार यांचे पती कै. संदीप मोतीराम हजारे यांचे निधनानंतर उपरोक्त मिळकत अर्जदार, मुलगा कु. साहील संदिप हजारे आणि मुलगी कुमारी सेजल संदिप हजारे यांचे नावे झालेली आहे तशी नोंद फेरफार क्र. ८४० कडे अस्तित्वात आहे. अर्जदार यांनी त्यांचे व त्यांचे सहहिस्सेदार यांचे नावे असलेली वडिलोपार्जित मालकी हक्काची उपरोक्त नमुद मिळकत म्हणजे मौजे मोहिलीतर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे व हिस्सा क्र. ११/१/क च्या मिळकती मधील आपला हक्क इतर सहहिस्सेदार यांचे लाभांत सोडणेचा आहे. सदर अर्जदार व त्यांचा मुलगा कु. साहिल संदीप हजारे व मुलगी कुमारी सेजल संदीप हजारे यांना हक्कसोडपत्राचे मोबदल्यासाठी रक्कम रुपये २,५०,०००/- इतका मोबदला मिळणार आहे. सबब अर्जदार यांची कु.सेजल संदीप हजारे यांची पालनकर्ता म्हणून नेमणूक होऊन तसे प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाला काही हरकत असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत मे. न्यायालयात दाखल करावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस पालनकर्ता दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**कनिष्ठ लिपिक**
**जिल्हा न्यायाधिश पनवेल,**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**जिल्हा न्यायाधिश पनवेल**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## हॅरिस रौफला ३० टक्के दंड



**दुबई :** पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज हॅरिस रौफ याला गत रविवारी भारताविरुद्धच्या आशिया चषक सुपर फोर सामन्यादरम्यान केलेल्या असभ्य आणि आक्षेपार्ह वर्तनाबद्दल त्याच्या सामना शुल्कातून ३० टक्के दंड ठोठावण्यात आला. याच सामन्यात अर्धशतक पूर्ण केल्यानंतर 'बंदुकीच्या गोळीबार'ची आगळीक करणारा त्याचा संघ सहकारी साहिबजादा फरहानला मात्र कोणताही दंड न आकारता केवळ ताकीद देऊन सोडण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरसाठी भारतीय लष्कराचे कौतुक केले होते. सूर्यकुमारच्या टिपणीबद्दल पीसीबीने अधिकृत तक्रार दाखल केली होती, त्यानंतर आयसीसीकडून ही कारवाई केली आहे.

## इशाला तीन सुवर्णपदक

**भाकरवड :** महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विविध शालेय तालुकास्तरीय स्पर्धा क्रीडा संकुल नेहुली येथे संपन्न झाल्या. यामध्ये को. ए. सो. माध्यमिक विद्यामंदिर शहाबाज शाळेची विद्यार्थिनी इशा पाटील हिने १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे आणि लांब उडी या तिन्ही क्रीडा प्रकारांमध्ये आपल्या खेळाचे सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करत, अव्वल स्थान पटकावून तीन सुवर्ण पदकांची मानकरी ठरली. त्याचप्रमाणे जियो इन्स्टिट्यूट उलवे उरण येथे झालेल्या १४ वर्षीय अजिंक्यपद मैदानी स्पर्धेमध्ये ६० मीटर धावणे, लांब उडी आणि बॅक थ्रो या स्पर्धा प्रकारांमध्ये सुवर्णपदकांची मानकरी ठरलेली आहे. तिचे यतीराज पाटील शाळा समिती शहाबाजचे चेअरमन अशोककुमार भगत, जगदीश पाटील, सायली पाटील, गीता पाटील, सदू दुटे, जीवन पाटील भाकरवड तसेच शाळेतील सर्व शिक्षक आणि क्रीडाप्रेमी ग्रामस्थांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## के. एल. राहुलचा झंझावात

**लखनौ :** तापाने फणफणलेला असतानाही के. एल. राहुलने आपले सर्वस्व पणास लावत नाबाद १७६ धावांची मास्टरक्लास खेळी साकारल्यानंतर त्याला साई सुदर्शनसह अन्य फलंदाजांचीही समयोचित साथ लाभली आणि या जोरावर भारत 'अ' संघाने येथील दुसऱ्या अनधिकृत कसोटीत ऑस्ट्रेलिया 'अ' संघाला चारीमुंड्या चीत केले. भारत 'अ' संघाने यासह २ सामन्यांची ही कसोटी मालिका १-० अशा फरकाने जिंकली. वास्तविक, या लढतीतील चौथ्या डावात ४१२ धावांचे कडवे आव्हान भारतासमोर होते; पण २ बाद १६९ या मागील धावसंख्येवरून डावाला पुढे सुरुवात केल्यानंतर राहुल व सुदर्शन यांची झंझावाती शतके निर्णायक ठरली. राहुलने २१० चेंडूंत नाबाद १७६ धावा फटकावल्या. त्याच्या या शतकी खेळीत १६ चौकार व ४ उत्तुंग षटकारांचा समावेश राहिला. याशिवाय, सुदर्शनने १७२ चेंडूंत ९ चौकार व एका षटकारासह १०० धावा फटकावल्या. शतक झळकावल्यानंतर तो लागलीच बाद झाला.





## मदने यांची तहसीलदारपदी नेमणूक

**चिपळूण :** कबड्डीच्या मैदानावर भारताचा झेंडा अभिमानाने फडकवणाऱ्या आणि २०१४ साली दक्षिण कोरियातील इंचॉन येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या सुप्रसिद्ध कबड्डीपटू नितीन मदने यांची महाराष्ट्र शासनाच्या वतीने तहसीलदार पदावर नेमणूक करण्यात आली आहे. खेळाच्या माध्यमातून प्रगतीचा मार्ग शोधत आपल्या कर्तृत्वाने नवा इतिहास घडवणाऱ्या नितीन मदने यांच्या या यशस्वी वाटचालीचा गौरव करण्यासाठी प्रो कबड्डी लीगमध्ये यू मुम्बा आणि बंगाल वॉरियर्स संघातून आपल्या खेळाची छाप पाडणाऱ्या नितीन मदने यांना तहसीलदार पदावर नियुक्ती मिळाल्याने क्रीडा विश्वात आनंदाचे वातावरण आहे. आ. निकम यांनी त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## कोळवलीचा रिले संघ विजयी

**आबलोली :** रत्नागिरी जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये देवघर येथे घेण्यात आलेल्या पावसाळी शालेय क्रीडा स्पर्धेत गुहागर तालुक्यातील ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था संचलित, माध्यमिक विद्यालय पंचक्रोशी कोळवली या विद्यालयाच्या १४ वर्षाखालील मुलांच्या रिले संघाने ४*१०० मी. रिले या प्रकारामध्ये तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. आर्यन मते, रसिक पाष्टे, श्रेयस सोलकर, साहिल माटल आणि करण भुवड या खेळाडूंनी अतिशय जोरदार खेळ करत अंतिम सामन्यांमध्ये सर्व संघावर मात करून गुहागर तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. यामुळे या खेळाडूंचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. त्याचबरोबर विजयी खेळाडूचे ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शांताराम वाघे, उपाध्यक्ष रामचंद्र मोरे, सचिव नारायण मोहिते, खजिनदार वासुदेव डिंगणकर, शंकर जोशी तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि मुख्याध्यापक विजय पिसाळ यांनी विजयी खेळाडू आणि मार्गदर्शक शिक्षक बाळासाहेब लवटे, कर्मचारी विकास कदम या सर्वांचे अभिनंदन केले.

# भारत विजयी चौकारासाठी सज्ज

## ।।स्पर्धेत सलग सहा विजयांचा झंझावात कायम ।। महामुकाबल्याकडे क्रिकेट विश्वाचे लक्ष

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने आशिया कप २०२५ स्पर्धेत सलग ६ विजय मिळवले आहेत. भारताने साखळीनंतर सुपर ४ फेरीत विजयी झंझावात कायम ठेवत प्रतिस्पर्धी संघाला पराभवाची धुळ चारली. भारताने यूएई, ओमान, बांग्लादेश आणि श्रीलंका या संघांना १ वेळा पराभूत केले. तर भारताने पाकिस्तानला साखळी आणि सुपर ४ फेरीत एकूण २ वेळा पराभूत केले. आता भारतीय संघाने आशिया कप जिंकण्यासाठी या स्पर्धेत पाकिस्तान विरुद्ध तिसऱ्यांदा दोन हात करणार आहे.



आशिया कप स्पर्धेच्या इतिहासात ४१ वर्षांत भारत विरुद्ध पाकिस्तान हे २ संघ अंतिम फेरीत आमनेसामने येण्याची पहिलीच वेळ ठरली आहे. या महामुकाबल्याकडे क्रिकेट विश्वाचं लक्ष लागून राहीले आहे. हा सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये होणार आहे. भारत-पाकिस्तान अंतिम सामन्यानिमित्ताने दुबईत सहाव्यांदा आमने-सामने असणार आहेत. या आधी दोन्ही संघात ५ टी २० सामने झाले आहेत. भारताने या ५ पैकी ३ सामने जिंकले आहेत. तर पाकिस्तानने २ सामने जिंकले आहेत. भारतीय संघ या टी २० आशिया कप २०२५ स्पर्धेआधी पाकिस्तान विरुद्ध टी २० सामने जिंकण्याबात २-१ ने पिछाडीवर होती. मात्र भारतीय संघाने साखळी आणि सुपर ४ फेरीत पाकिस्तानला पराभूत करत ३-२ ने आघाडी घेतली. भारताने १४ सप्टेंबरला साखळी फेरीत ७ विकेट्सने पाकिस्तानला लोळवलं. त्यानंतर २१ सप्टेंबरला पुन्हा एकदा भारताने पाकिस्तानला पराभूत केलं. भारतीय संघाने सुपर ४ फेरीत पाकिस्तानवर ६ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. भारताने यासह दुबईत ५ सामन्यांनंतर ३-२ ने आघाडी घेतली आहे.

### पाकिस्तानची नाजूक फलंदाजी

भारत अभिषेकवर जास्त अवलंबून असेल, तर पाकिस्तानची फलंदाजीची कमजोरी अधिक स्पष्ट आहे. त्यांची फलंदाजी अत्यंत निराशाजनक राहिली आहे. साहिबजादा फरहान वगळता त्यांचा दुसरा कोणताही फलंदाज प्रभावी ठरलेला नाही. सईम अयुबला चार वेळा शून्यावर बाद व्हावे लागले आहे. हुसेन तलत आणि सलमान अली आगा भारताच्या फिरकी गोलंदाजांपुढे अपयशी ठरले आहेत.

### शेवट गोड तर सर्व गोड

रविवारचा सामना सभ्यतेपेक्षा निकालासाठी अधिक लक्षात ठेवला जाईल. शेवट गोड तर सर्व गोड या म्हणीप्रमाणे, भारतासाठी फक्त एकच शेवट स्वीकारार्ह असेल.

# महावितरणच्या महिला संघाला सुवर्णपदक

## ■ पुरुष संघाची कांस्यपदकाची कमाई

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय बॅडमिंटन २०२५ च्या स्पर्धेत महावितरणच्या महिला संघाने सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावले तर पुरुष संघ कांस्यपदकाचे विजेते ठरले. यासह महिला खेळाडूंनी दुहेरीत सुवर्ण, एकेरीमध्ये रौप्यपदक जिंकत राष्ट्रीय स्पर्धेत वर्चस्व गाजवले. या सर्व खेळाडूंचे महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी अभिनंदन केले आहे.

हरियाणा येथे तीन दिवसीय ४७ व्या राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेचा शुक्रवारी (दि. २६) समारोप झाला. देशभरातली विविध वीज कंपन्यांचे संघ या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले होते. महावितरणच्या महिला संघाने स्पर्धेत एकतर्फी वर्चस्व गाजवत अंतिम फेरीत गुजरात संघाला २-० ने पराभूत केले आणि सलग दुसऱ्या सुवर्णपदकाचा मान मिळवला. महावितरणच्या रितिका नायडू (कर्णधार), अनिता कुलकर्णी, चैत्रा पै, वैष्णवी गांगरकर, राणी पानसरे या खेळाडूंनी ही कामगिरी केली. तर चैत्रा पै व रितिका नायडू यांनी दुहेरी महिला गटात सुवर्णपदकाची तर अनिता कुलकर्णी यांनी एकेरी गटात रौप्यपदकाची कमाई केली.




महावितरणच्या पुरुष संघातील भरत वशिष्ठ, पंकज पाठक, रोहन पाटील, सुरेश जाधव, दिपक नाईकवाडे यांनी चुरशीच्या सामन्यांमध्ये उपांत्य फेरीपर्यंत धडक दिली व स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. महिला व पुरुष संघाचे प्रशिक्षक म्हणून गुणवंत इप्पर, संघ व्यवस्थापक म्हणून भूपेंद्र वाघमारे यांनी काम पाहिले. महिला व पुरुष बॅडमिंटन संघातील खेळाडूंना पुणे येथे विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

# कुस्ती स्पर्धेत शुभम ढेबेचे यश

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

जिल्हा क्रीडा संकुल रत्नागिरी येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रत्नागिरी व रत्नागिरी जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत चिपळूण तालुक्यातील अलोरे प्रभागातील जिल्हा परिषद आदर्श शाळा पोफळी होडेवाडी शाळेचा शुभम ढेबे शाळेपासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर डोंगरावर राहणाऱ्या या विद्यार्थ्याने (१४ वर्षाखालील ३५ किलो वजनी गटात) सुवर्णपदक मिळवत शाळेच्या इतिहासात व संपूर्ण जिल्हा परिषद शाळांच्या इतिहासात कुस्ती या क्षेत्रातील एक नवीन पान सुवर्ण अक्षराने लिहिले आणि कोल्हापुर येथे होणाऱ्या विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी आपले स्थान निति केले.

शुभमला मुख्याध्यापक व कुस्ती प्रशिक्षक आप्पासो मदने यांनी मार्गदर्शन केले. शाळेतील सर्व शिक्षकांचे बहुमोल सहकार्य मिळाले. चिपळूण तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी इरणक, अलोरे प्रभागाच्या विस्तार अधिकारी सौरवी जाधव आणि शिरगाव केंद्राचे केंद्रप्रमुख गर्जे यांनी शुभमचे व क्रीडा प्रशिक्षकांचे अभिनंदन केले. पोफळी ग्रामपंचायत सर्व सदस्य, ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समिती यांनी शुभमचे अभिनंदन करून विभागस्तरीय कुस्ती स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

# बॅडमिंटन स्पर्धेत पोफळी प्रशालेचे यश

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र व रत्नागिरी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेमध्ये परशुराम एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पोफळी प्रशालेने यश प्राप्त केले. या स्पर्धेमध्ये १४ वर्षे मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. या संघामधील अवनी शिंदे, अनन्या कदम, अनन्या जाधव, परी जाधव, श्रीया नरळकर या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करून नामवंत संघाना पराभूत करून विजयश्री खेचून आणली. त्याचबरोबर १९ वर्षे वयोगट मुलींच्या संघाने जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक पटकावला. या संघामध्ये अनुष्का कदम, शर्वरी पवार, वेदिका बामणे, रिया पवार व आदिश्री पवार या खेळाडूंचा समावेश होता. सर्व यशस्वी खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा शिक्षक, विज्ञान शिक्षक व समुपदेशक प्रदीपकुमार यादव यांचे मार्गदर्शन लाभले.

# वसंत विहार शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

उत्तर प्रदेशमधील गोरखपूर येथे पार पडलेल्या सीआयएससीई नॅशनल क्रिकेट स्पर्धेत मुलींच्या अंडर १४ महाराष्ट्र संघात वसंत विहार शाळेच्या तब्बल नऊ मुली खेळल्या. या स्पर्धेत महाराष्ट्र संघ अंतिम फेरीत पोहोचत उपविजेता ठरला होता. आता या शाळेच्या पाच मुलींची १४ वर्षांखालील हिंदुस्थानी संघात वर्णी लागली आहे. त्यामुळे वसंत विहार शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



शालेय क्रिकेटमध्ये महत्त्वाची समजली जाणारी सीआयएससीई नॅशनल क्रिकेट स्पर्धा नुकतीच गोरखपूर येथे पार पडली. यात १४ वर्षांखालील मुलींच्या स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे जेतेपदाचे स्वप्न थोडक्यात हुकले. या महाराष्ट्र संघात वसंत विहार शाळेच्या तब्बल नऊ मुली निवडण्यात आल्या होत्या. त्यानंतर या स्पर्धेत खेळलेल्या देशभरातील संघांमधून महाराष्ट्र संघातील आठ मुली या भारतीय संघात खेळल्या. यातील पाच मुली या मुख्य संघात आहेत तर तीन मुलींची राखीव म्हणून निवड झाली आहे.

# इगाचा तिसऱ्या फेरीत प्रवेश

**नवी दिल्ली :** विम्बल्डन विजेत्या इगा स्वियातेकने शनिवारी चायना ओपनमध्ये जबरदस्त कामगिरी करत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. तिने चिनी खेळाडू युआन यू हिचा ६-०, ६-३ असा पराभव केला. इतिहासातील सलग तीन हंगामात १००० स्पर्धांमध्ये २५ किंवा त्याहून अधिक विजय मिळवणारी पहिली खेळाडू ठरली. जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेली टेनिसपटू आणि विम्बल्डन विजेती इगा स्वीटेकने शनिवारी चायना ओपनच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला.

## जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धा

# शैलेशला सुवर्ण; वरुणला कांस्य

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत शनिवारी पदकतालिकेत खाते उघडले. पुरुषांच्या उंच उडीत टी-६३ प्रकारात शैलेश कुमारने सुवर्णपदक पटकावत विक्रमी झेप घेतली, तर वरुणने कांस्यपदक जिंकले आहे.



शैलेशने टी-४२ प्रकारात १.९१ मीटर उंची पार करून नवीन स्पर्धा विक्रम नोंदवला. अमेरिकेचा ऑलिम्पिक विजेता एझ्रा फ्रेक याने रौप्यपदक मिळवले. फ्रेक आणि वरुण भाटी या दोघांनी १.८५ मीटरची उंची पार केली होती; मात्र, काऊंटबॅकमुळे फ्रेकने रूपेरी यश संपादन केले, तर भाटीला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. भारताचा राहुल हा आणखी एक खेळाडू स्पर्धेची अंतिम फेरी गाठणाऱ्या पाचपैकी तिसरा खेळाडू ठरला होता.

# रायफल स्पर्धेत प्रसाद द्वितीय

**। पाली । प्रतिनिधी ।**

मराठा मंदिर न्यू इंग्लिश हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थी प्रसाद कोलतेने १४ वर्षांखालील मुलांच्या गटामध्ये रायफल स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयाअंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धा श्री वालावलकर जोशी चॅरिटेबल ट्रस्ट डेरवण येथे पार पडली. या स्पर्धेत पाली येथील मराठा मंदिर न्यू इंग्लिश हायस्कूलचा प्रसादने चमकदार कामगिरी करत १४ वर्षांखालील मुलांच्या गटामध्ये ओपन साइड रायफल स्पर्धेत एकूण २७० गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला.

## स्पर्धेत पदकांची हॅट्ट्रिक | दुहेरी कंपाऊंडमध्ये रौप्य

# तिरंदाजीत शीतल बनली वर्ल्ड चॅम्पियन

**। मुंबई। प्रतिनिधी ।**

भारताची तिरंदाज शितल देवीने पॅरा जागतिक तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. ती पायाने तिरंदाजी करणारी पहिली भारतीय महिला आहे. या स्पर्धेतील तिचे हे तिसरे पदक आहे. भारताची तिरंदाज शितल देवीने वयाच्या १८ व्या वर्षीच इतिहास घडवला आहे. तिने शनिवारी ग्वांगजूमध्ये होत असलेल्यआ पॅरा जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. तिने महिलांच्या एकेरी कपांऊंड प्रकारात हे सुवर्णपदक पटकावलं. शितल पाय आणि हनवटीचा वापर करून तिरंदाजी करते. ती पायाने तिरंदाजी करणारी भारताची पहिलीच महिला तिरंदाज आहे. तसेच पॅरा जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेतही ती पायाने तिरंदाजी करणारी एकमेव तिरंदाज आहे.शितलने शनिवारी झालेल्या अंतिम सामना जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर असलेल्या तुर्कीच्या गिर्डीला १४६-१४३ अशा फरकाने पराभूत करत सुवर्णपदक जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली. विशेष म्हणजे या स्पर्धेतील हे तिचे तिसरे पदक ठरले. यापूर्वी तिने मिश्र दुहेरी कंपाऊंड प्रकारात टोमन कुमारसह कांस्यपदक जिंकले होते. तसेच महिला दुहेरी कंपाऊंड प्रकारात शितलने सरितासह रौप्यपदक जिंकले होते. त्यांना अंतिम सामन्यात तुर्कीच्याच जोडीकडून पराभवाचा धक्का बसला होता. त्यांना गिर्डी आणि फातमा या जोडीने १४८-१५२ अशा फरकाने पराभूत केलं होते.



दरम्यान, शनिवारी झालेल्या सुवर्णपदकाच्या लढतीत गिर्डीने शितलला शेटपर्यंत झुंज दिली होती. पहिल्या फेरीत २९-२९ अशी बरोबरी झाली होती. दुसऱ्या फेरीत शितलने ३०-२७ असा विजय मिळवला. तिसऱ्या फेरीतही २९-२९ अशी बरोबरी झाली होती. शेवटच्या फेरीत मात्र शितलने दमदार कामगिरी केली आणि ३० पॉइंट्स मिळवत सुवर्णपदाकावर नाव कोरले.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)